
MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष पंचविसावे / अंक १० / ऑक्टोबर २०२४

## संपादकीय

### विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू वृत्तीचे दर्शन

ऑक्टोबर महिन्याच्या ७ तारखेला ऐने येथील 'ग्राममंगल संस्थे'ला भेट देण्याची मला संधी मिळाली. या संस्थेतर्फे एक शाळा चालवली जाते. या शाळेत आजूबाजूला असलेल्या गावातील आदिवासी मुले शिक्षण घेतात. या शाळेतील इयत्ता ६ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांशी मी संवाद साधला. त्यातून मला बरेच काही शिकायला मिळाले.

मी आधी 'विज्ञान म्हणजे काय?' ते समजावून दिले. 'माणसाचे कुतूहल हा विज्ञान प्रगतीचा पाया आहे' हे मी त्यांना पटवून दिले. त्यानंतर त्यांच्या मनात असलेले प्रश्न विचारण्यासाठी त्यांना उत्तेजन दिले. सुरुवातीला मुलांकडून काहीच प्रतिसाद येईना. थोड्या वेळानंतर एक मुलीने धाडस करून हात वर केला. तिचा प्रतिसाद पाहून मला आनंद झाला. प्रश्न विचारण्यासाठी मी तिला पुढे पाचारण केले. पुढे न येता आपल्याच जागेवरून प्रश्न विचारणे तिने पसंत केले. तिने विचारलेल्या प्रश्नाचे मी थोडक्यात, पण सहानुभूतीने उत्तर दिले. याचा परिणाम असा झाला की, इतर मुलांना प्रश्न विचारण्याची प्रेरणा मिळाली. त्यानंतर प्रश्नांचा भडीमार सुरू झाला. जेवणाची सुट्टी झाली म्हणून प्रश्नोत्तराचे सत्र आवरते घ्यावे लागले. त्या विद्यार्थ्यांनी विचारलेले काही प्रश्न खाली दिलेले आहेत.

१. हवा का दिसत नाही?

२. हवेच्या वेगवेगळ्या घटकांची माहिती कशी झाली?

३. आपली पृथ्वी कशी निर्माण झाली?

४. आपल्या देशात ठरावीक काळातच पाऊस का पडतो?

५. जमिनीत बी पेरले की त्याचे झाड कसे होते?

६. झाडे आपले अन्न कसे तयार करतात?

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

७. विमान कसे उडते?

८. हेलिकॉप्टर सरळ वर कसे जाते?

९. माणूस कसा निर्माण झाला?

१०. आपल्या शरीराला घाम का येतो?


मुलांनी विचारलेले प्रश्न पाहून मला आश्चर्य वाटले. त्यांच्या जिज्ञासू वृत्तीला घरी आणि शाळेत त्यांना कधीही उत्तेजन मिळाले नाही. त्यामुळे त्यांचे कुतूहल मारले गेले होते. सांगितले ते मुकाट्याने ऐकायचे, शंका आली तरी ती विचारायची नाही अशी प्रवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली होती. तरीही संधी मिळताच त्यांच्या मनातील प्रश्न बाहेर आले हे विशेष. असा अनुभव मला अनेकदा आला आहे.

१९७६ च्या एप्रिल महिन्यात मी होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रात रुजू झालो. त्याआधीच 'होमी भाभा केंद्र आणि महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ' यांच्यात एक करार झाला होता. त्यानुसार मंडळ प्रकाशित करीत असलेल्या किशोर मासिकात 'शंका-समाधान' हे सदर चालविण्याची जबाबदारी होमी भाभा केंद्राने घ्यायची असे ठरले. यासाठी केंद्राकडे प्रश्न पाठविण्याचे आवाहन करण्यात आले. या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या गावांतून केंद्राकडे मोठ्या प्रमाणावर प्रश्न येऊ लागले. यातील काही निवडक प्रश्नांची उत्तरे किशोर मासिकात प्रकाशित केली जात असत. बाकीच्या प्रश्नांची उत्तरे घरपोच पाठविली जात असत. हे कार्य अनेक वर्षे चालले. त्याचा उपयोग करून 'कुतूहल' नावाची ४ पुस्तके प्रकाशित करण्यात आली. ही पुस्तके 'ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस'ने प्रकाशित केली असून, त्यांना विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्याकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

१९८० मध्ये सामाजिक दृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी केंद्रात एक प्रकल्प घेण्यात आला होता. या प्रकल्पासाठी मुंबई महापालिकेच्या शाळांमध्ये शिकणारे ४० विद्यार्थी निवडले होते. या मुलांना शनिवारी दुपारी 'होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रात' बोलावले जात असे. पहिल्याच दिवशी त्यांना प्रश्न पेटीची माहिती देऊन त्यांच्या मनातील प्रश्न कागदावर लिहून तो कागद पेटीत टाकावा असे त्यांना सांगण्यात आले. दुसऱ्या शनिवारी जवळजवळ सर्वच विद्यार्थ्यांनी प्रश्न टाकले होते. त्या एकाच दिवशी विचारलेल्या प्रश्नांची संख्या होती १२०. यामध्ये त्यांच्या अभ्यासक्रमाशी संबंधित प्रश्न होते, तसेच दैनंदिन जीवनातील अनुभवांवर आधारित प्रश्न देखील होते.

'मराठी विज्ञान परिषदे'च्या वार्षिक संमेलनात प्रश्नोत्तराचा एक कार्यक्रम असतो. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने प्रश्न विचारले जातात असा अनुभव आहे. २०१० चे संमेलन यवतमाळ जिल्ह्यातील वणी या शहरात भरविण्यात आले होते. या संमेलनाचे आयोजन करीत असताना एक प्रश्न पेटी मुलांसाठी ठेवावी असे मी सुचविले. तेव्हा आयोजकांनी एक लहानसा डबा मला दाखविला. मी त्यांना सांगितले, 'हा डबा पुरणार नाही जरा मोठा डबा घ्या.' तेव्हा त्यांनी सांगितले की, 'आमच्या खेड्यातील मुलांमध्ये एवढी कुतूहल-वृत्ती नसते. ते फारसे प्रश्न विचारणार नाहीत.' त्यांच्या या मताशी सहमत न होता मी मोठी पेटी ठेवायला सांगितली. आयोजकांनी नाखुषीने माझे म्हणणे मान्य केले. प्रत्यक्षात अनुभव

(पृष्ठ क्र. २६ वर)




**वर्ष पंचविसावे / अंक १० / ऑक्टोबर २०२४**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २९ वे/अंक ४ ला)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | बालकांचे लैंगिक शोषण<br>चीड, काळजी, सावधानी आणि कायदा | प्रा. विनोद वाघ | ३ |
| ३) | जॉर्ज फर्नांडिस:<br>'बंदसम्राटाची' सुसाट गोष्ट... | श्री. अजिंक्य कुलकर्णी | ५ |
| ४) | बांगलादेशचा धडा... | श्री. अभिजित जोग | ८ |
| ५) | प्रा. श्रीराम पुजारी जन्मशताब्दी : अनुभूती | श्री. प्रमोद बापट | ११ |
| ६) | ज्येष्ठ कवी ग्रेस यांना पत्र | डॉ. श्रीपाद जोशी | १२ |
| ७) | सीता - जशी असायला हवी तशी | श्री. राजेश कुलकर्णी | १४ |
| ८) | उंटांची अद्‌भूत रम्य दुनिया २०२४<br>हे आंतराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | १९ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
  Email : vpmt1935@gmail.com
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# बालकांचे लैंगिक शोषण
# चीड, काळजी, सावधानी आणि कायदा

*आपण जेवढे प्रगत होत आहोत, विज्ञानाची उत्तुंग प्रगती होत आहे, तेवढे भयावह असे सामाजिक प्रश्नदेखील वाढत्या प्रमाणात डोके वर काढत आहेत. त्यामुळे, 'हीच मानवी प्रगती का? अशी विकृत शंका येणे साहजिकच आहे. अशा पैकी एक विषय म्हणजे, 'बालकांचे लैंगिक शोषण'. याला जबाबदार कोण? समाज, पालक, आपले कायदे की आणखी काही? याचा ऊहापोह करणारा लेख – संपादक*


मनुष्य योनीत जन्म घेणे याचा अर्थ 'राक्षसी आणि सैतानी मानसिकतेतून मुक्तता मिळणे' असा होत नाही. मनुष्य देहाचा उपयोग किमान मनुष्य म्हणून ओळखले व गणले जाऊ एवढ्यासाठी जरी केला तरी धन्य. मनुष्यरुपात असणारी सैतानी औलाद बघायची असतील तर अगदी कळी रूपात असलेल्या फुलांना स्वत:च्या वासना आणि हव्यासापोटी चिरडणाऱ्या त्या नराधमामध्ये शोधता येईल. कुठे एखाद्या शाळेमध्ये अशी घटना घडली म्हणून यावर प्रतिक्रिया येत आहे का, तर नक्कीच नाही. आपल्या घरात, शेजारी, शाळेत, ट्युशन क्लासेस, बागेत, आसपास, सैतानाला पुजणारी जी लोकं तयार झाली आहेत, त्या भीतीच्या सावटामध्ये हे लिहावे लागत आहे.

वातावरण एवढे दूषित झाले आहे की, एखाद्या अनोळखी आणि बऱ्याचदा ओळखीच्याच्या कडेवर आपले बाळ द्यायची हिंमत पालक करू शकत नाही. कधीकाळी शेजारच्या काकाच्या विश्वासावर आपल्या छोट्याशा बाळाला सोडून जाण्याची सोय आज राहिलेली नाही. काय चाललंय, कोण चुकतंय आणि कुठं चुकतंय?

NCRB यांच्या २०२२ च्या अहवालाप्रमाणे 'लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२' POSCO या कायद्याअंतर्गत ६३,४१४ एव्हढे गुन्हे नोंद झाले. याचा अर्थ १७३ गुन्हे प्रत्येक दिवशी आणि प्रत्येक तासाला ७ गुन्हे.

(https://www.newsclick.in/three-major-takeaways-ncrb-report-)

cases recorded in 2022.




वरील आलेख हा २०१७ ते २०२२ या वर्षातला आहे, तो बघितला तरी कळून येईल की, मागील सहा वर्षांमध्ये पोक्सो कायद्याअंतर्गत नोंद होणारे (नोंद न झालेले वेगळेच) गुन्ह्यांचे प्रमाण कसे वाढत चालले आहे.

भारतीय दंड संहिता (IPC) हा कायदा कुठेतरी कमी पडत होता म्हणूनच पोक्सो कायदा आणला होता, ज्यामध्ये कठोर शिक्षेचे प्रावधान करण्यात आले. पण गुन्ह्यांचे प्रमाण बघता आरोपींना या शिक्षेची भीती वाटत आहे असे जाणवत तरी नाही.

जगाच्या किंवा भारताच्या कोणत्याही कोपऱ्यात अशा घटना घडल्या की, खूप वाईट वाटते, चीड निर्माण होते. सामान्य माणूस म्हणून ही चीड, हा राग कुठे व कसा व्यक्त करावा हेही आपल्याला माहीत नसते, म्हणून सामाजिक माध्यमांवर आपण आपला क्रोध, राग, चीड व्यक्त करतो. पण ही चीड नेमकी कुणा विरोधात व्यक्त करायला हवी? आरोपी, ज्याला लोकलज्जेचे काहीही पडलेले नाही, त्यामुळे सैतानाला

चुका स्वीकारण्याचे धैर्य असल्यास नेहमीच क्षमा केली जाऊ शकते.

सैतानी करू नको असे म्हणण्यात काय हशील आहे? पण असे गुन्हे होऊच नये म्हणून जे कुणी कारणीभूत असतात त्यांच्यावर मग सगळा राग, चीड आंदोलन व इतर मार्गाने व्यक्त होतो. यामध्ये ब-याचदा, घटना घडला तिथल्या वरिष्ठांचा नाकर्तेपणा, पोलिसांचा ढिसाळ कारभार आणि थकलेली न्याय व्यवस्था या तिघांचाही समावेश असतो. कायद्याप्रमाणे पोक्सो अंतर्गत नोंद होणाऱ्या गुन्ह्यांचा तपास एका महिन्यात पूर्ण झाला पाहिजे. खरंच होतोय का? मेडिकल चेकअप, फोरेन्सिक अहवाल व इतर जबानी हे सर्व एका महिन्यात पूर्ण करण्यात कितपत यश येते हा एका वेगळ्या अभ्यासाचा विषय आहे. पोलिसांनी वेळेवर गुन्हा नोंदविला नाही असा अनेक लोकांचा आक्षेप असल्याचे आपण बघितले आहे. न्यायालयांनी एका वर्षाचा आत खटला संपविणे कायद्याला अपेक्षित आहे. मुंबई उच्च न्यायालयाला एक समिती स्थापन करावी लागली फक्त हे बघण्यासाठी की पोक्सो कायद्याअंतर्गत खटल्यास ३ ते ४ वर्ष का लागत आहे? न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, अजय गडकरी आणि भारती डांगरे यांच्या समितीला प्रलंबित खटल्याचे कारणे व त्यावर उपाय शोधावे लागले.

खरे तर, आई-वडील, घरातली ज्येष्ठ सदस्य, शाळेचे शिक्षक यांनी देखील काळजी घेणे गरजेचे आहे. अशा घटना घडूच नयेत हा पहिला प्रयत्न आणि दुर्दैवाने घडली तर लपवू नये ही दुसरी काळजी. शाळेची किंवा संस्थेची बदनामी होईल ही पळवाट न घेणे कधीही चांगलेच.

वेळोवेळी आपल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या कार्यशाळा, पालकांच्या बैठका, मुलासोबतचा संवाद, मानसशास्त्र व बालमानस शास्त्रज्ञ यांच्या सोबतही मुलांच्या गप्पा घडवून आणल्या पाहिजेत. पालकांची मोठी जबाबदारी ही आहे की, त्यांनी मुलांशी अबोला ठेवू नये. अनेक पालकांना स्वत:च्या मुलांशी बोलायला वेळ नसतो, तेव्हा ते मनातलं काय ओळखतील? योग्य संवाद व संवादातील विश्वास असे गुन्हे सुरवातीच्या लक्षणामध्ये प्रतिबंधित करता येऊ शकतील. मुलांच्या बोलण्याला, तक्रारीला प्रत्येक वेळेस गंभीरपणे घेतले पाहिजेत. शेजारचे काका मला आवडत नाहीत किंवा अमुक अमुक शिक्षक किंवा दादा किंवा कुणीही आवडत नाही असे आपले मूल का म्हणत असेल याची दखल जर पालक घेणार नसतील तर ते लहान मूल किती लाचार होऊ शकते याचा विचार पालकांनी व शिक्षकांनी करायला पाहिजे. ही सावधगिरी एखादे महापाप होण्यापूर्वीच ठेचता येऊ शकते.

कायदा आहे, कायदा अजूनही कठोर होईल, आरोपीला फाशीची शिक्षा ही उद्या कायदा दुरुस्ती करून करता येईल, पण आरोपीला कठोर शिक्षा जेवढी आवश्यक आहे तेवढाच असे गुन्हे होऊच नये यासाठीची उपाययोजना आणि यंत्रणा आवश्यक आहे. पोक्सो कायदा अतिशय कठोर असला तरी त्याची अंमलबजावणी किती कठोर आहे याचाही विचार करायला हवा. दोष सिद्ध होण्याचे प्रमाण किती आहे हाही गांभीर्याने घेण्याचा विषय आहे.

शासन-प्रशासनाचा जोर हा असे गुन्हे न घडू देण्यासाठी लागला पाहिजे व जर घडलाच तर कुणाचीही पर्वा न करता कायद्याला अपेक्षित तपास वेळेत होऊन शिक्षा झाली पाहिजे. नामांकित खेळाडूच्या आरोपावर जेव्हा शासन-प्रशासन मौन धरून गप्प बसते तेव्हा अनेकांच्या मनातील कायद्याविषयीची भीती लुप्त पावत असते. कायद्यात खूप ताकद असते, ती वापरायला जी ताकद लागते तिची उणीव असू नये, एवढेच अपेक्षित आहे. सविस्तर नंतर कधीतरी....

**- प्रा. विनोद एच. वाघ**
विप्रंमचे टीएमसी विधी महाविद्यालय
ठाणे

●●●

ज्यांना मित्र नसतील त्यांनी ते मिळवावेत. ज्यांना मित्र असतील त्यांनी ते जपावेत.
मित्रांशिवाय जगण्याची वेळ शत्रूवरही येऊ नये.

# जॉर्ज फर्नांडिस : 'बंदसम्राटाची' सुसाट गोष्ट...

*निळू दामले यांनी लिहिलेले 'सुसाट जॉर्ज' नावाने जॉर्ज फर्नांडिस यांची १९४० ते २०१० यादरम्यानची कारकीर्द पुस्तक रूपाने मांडली आहे. या पुस्तकाला चरित्र म्हणण्यापेक्षा जॉर्ज यांच्या राजकीय जीवनाचे 'प्रोफाइल' म्हणणे जास्त उचित होईल. या पुस्तकाचे परीक्षण युवा लेखक श्री. अजिंक्य कुलकर्णी यांनी लिहिले आहे - संपादक*

जुन्या राजकीय वर्तुळात संघ भाजपचे कार्यकर्ते असो वा समाजवादी, एकमेकांसमोर कायमच दंड थोपटून उभे असणाऱ्या या दोन्ही गटांचे लोक मात्र एका व्यक्तीसाठी प्रचंड हळवे होतात, ती व्यक्ती म्हणजे जॉर्ज फर्नांडिस! या दोन्ही गटांचा जॉर्ज हा हळवा कोपरा होता. 'जॉर्ज सारखा इमानदार माणूस आपण पाहिला नाही', यावर या दोन्ही गटांचे एकमत असे. समाजवादी चळवळीत आयुष्य घालवलेल्या जॉर्जना एका क्षणी भाजपच्या गोतावळ्यात जावे लागले ही त्यांची राजकीय अपरिहार्यता होती हे स्वतः जॉर्ज यांनी जाहीरपणे कबूल केले आहे. निळू दामले यांनी 'सुसाट जॉर्ज' नावाने जॉर्ज यांची १९४० ते २०१० यादरम्यानची कारकीर्द पुस्तक रूपाने मांडली आहे. या पुस्तकाला चरित्र म्हणण्यापेक्षा जॉर्ज यांच्या राजकीय जीवनाचे 'प्रोफाइल' म्हणणे जास्त उचित होईल. मंगळूर मध्ये जन्मलेल्या जॉर्ज यांची सर्व राजकीय कारकीर्द मात्र बिहार मधल्या मुजफ्फरपूर या मतदार संघात गेली. जात-पात, धर्माच्या अस्मिता प्रचंड टोकदार असणाऱ्या बिहार मध्ये तसा जन्माने ख्रिश्चन, पण स्वतःच्या आयुष्यात निधर्मी असणारे जॉर्ज हे बिहार मध्ये इतकी वर्षे टिकले कसे हा मोठा प्रश्न आहे! त्याचे उत्तर बहुतेक त्यांच्या अत्यंत साध्या राहणीमानात, प्रामाणिकपणा, स्वच्छ चारित्र्य आणि अगदी




तळागाळातील व्यक्तीलाही आपलं म्हणण्याच्या त्यांच्या स्वभावात असावं असं मला वाटतं. संघ भाजपनेही जॉर्ज यांचा कायमच फायदा उठवला. आम्हीही कसे 'सेक्युलर' आहोत हे दाखवण्यासाठी. तसेही भाजपात जॉर्ज हे 'आउटसाइडर' होते. पण भाजपात जॉर्ज यांच्या पाठीमागे एक मोठी शक्ती भक्कमपणे उभी होती. ती शक्ती म्हणजे अटल बिहारी वाजपेयी ही होय. वाजपेयी यांच्या पाठिंब्यामुळे जॉर्ज यांचे राजकारणात वजन खूप वाढलं. राजकीय वर्तुळात जॉर्ज यांना वाचपेयींनंतर पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून समजले जाऊ लागलं होतं. पण आपल्या ख्रिश्चन असण्याने आपण भाजपात तसे 'आउटसाइडरच' आहोत हे जॉर्ज यांना वेळीच उमगले होते. निकटवर्तीयांना ते तसं बोलूनही दाखवत की, ख्रिश्चन असल्याने या देशाचे पंतप्रधानपद मला कधीही मिळणार नाही.

जॉर्ज यांचा जन्म मंगलोरचा. बालपण व शिक्षण मंगलोरातच झालं. वडिलांशी त्यांचे काही फार विशेष असं पटत नव्हतं. वडील जॉर्ज यांना खेळू, वाचू देत नसत. त्यामुळे वडिलांबद्दल त्यांच्या मनात कायमच एक अढी राहिली. शालेय जीवनापासून जॉर्ज यांना वाचनाची प्रचंड आवड होती. ती पुढे शेवटपर्यंत टिकली. जॉर्ज यांचा गीता, बायबल यांचा दांडगा म्हणावा असा

आत्मा अमर असतो. त्याला अग्नी, शस्त्र आणि काळ सुद्धा नष्ट करू शकत नाहीत.

अभ्यास होता. तुरुंगात असताना गीतेच्या शिकवणीवर जॉर्ज इतर कैद्यांना गीतेवर प्रवचन देत. गीतेवर जॉर्ज यांचे किती प्रभुत्व होतं याचा एक छोटा प्रसंग आहे. गीता हा ग्रंथ प्रत्येक समयी वास्तवाशी ताडून त्यातून काय घेतलं पाहिजे यावर जॉर्ज तुरुंगातील कैदी, गुंड त्यांच्याशी गप्पा मारत. त्यामुळेच कर्मठ बिहारी ब्राह्मण सुद्धा बिहारच्या तुरुंगात जॉर्ज यांचे कट्टर अनुयायी झाले होते. दररोज दोन तास पूजा केल्याशिवाय घराबाहेर न पडणारे ब्राह्मण सुद्धा जॉर्ज यांच्या सोबत संपामध्ये, निवडणुकीमध्ये स्वतःला झोकून देत असत. जॉर्ज यांना कोणतेही व्यसन नव्हतं. सहकाऱ्यांना, ओळखीतल्या लोकांना सभेतून व्यसनापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करत. सुरवातीच्या काळात जॉर्ज यांनी काही वर्तमानपत्रे चालवली. टाइम्स ऑफ इंडियात प्रूफ रीडर म्हणूनही काम केलं. घर सोडून मुंबईत आलेल्या जॉर्ज यांना रणजीत भानु यांनी स्वतःच्या घरात आसरा दिला. कॉलेजात प्रवेश घेतल्यावर त्यांची ओळख मधू दंडवते यांच्याशी झाली. पोर्ट ट्रस्ट, डिमेलोनी स्थापन केलेली 'ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियन' इथे कामगारांचे संघटन केले. ट्रक ड्रायव्हर संघटनेतर्फे संप घडवून आणला. संपामुळे ट्रक ड्रायव्हर यांचा पगार वाढवून मिळाला. हळूहळू या संपांमुळे, युनियन मुळे कामगार जॉर्ज यांच्याकडे आकर्षित होऊ लागले. जॉर्ज समाजवादी चळवळीत सक्रिय झाले. नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण, अशोक मेहता ही समाजवादी पक्षातील देश पातळीवरील काही नावं त्यावेळी चांगली गाजत होती. जॉर्ज कम्युनिस्ट आणि काँग्रेस विरोधी होते. नेहरूंना त्यांचा नेहमी विरोध असे.

जॉर्ज सफाई कामगारांचे प्रश्न समजून घेत होते. या सफाई कामगारांत रिपब्लिकन पक्षाची एक संघटना होती. सफाई कामगारांसोबत जॉर्ज यांनी काम करायला सुरुवात केली तेव्हा हे रिपब्लिकन नेते चवताळले. जॉर्ज यांची तक्रार घेऊन ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे गेले. आंबेडकरांनी जॉर्ज यांना बोलावून घेतले. जॉर्ज आणि आंबेडकरांच्या अनेक भेटी झाल्या. कामगारांच्या न्यायासाठी, त्यांचे जीवन सुधारावे म्हणून आपण प्रयत्न करत आहोत हे जॉर्ज यांनी आंबेडकरांना समजावून सांगितले. सफाई कामगारांना जॉर्ज यांच्या मार्गाने न्याय मिळेल, यासाठी आपली जातीयवादी संघटना अपुरी पडणार हे आंबेडकरांच्या चाणाक्ष नजरेला वेळीच लक्षात आले होते. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना स्पष्ट सांगितले की, जॉर्ज ला युनियन करू द्या. तुम्ही त्यांना सहकार्यच करा. तो तुमचे कल्याण करेल. जॉर्ज हा केवळ पगारवाढ मागणारा कामगार पुढारी नाही. त्याच्याजवळ एक सामाजिक आणि आर्थिक दृष्टी देखील आहे असं आंबेडकरांचे मत झालं. संपाच्या भाषणात जॉर्ज म्हणत,संप हे लढ्यातील एक हत्यार आहे. संप हे लढ्याचे साध्य नव्हे. संपाच्या सभा, बेस्टच्या कामगारांचा संप, टॅक्सी ड्रायव्हर यांचा संप अशा संपाच्या वेळी जॉर्ज वर अनेक वेळा हल्ले झाले. कित्येक वेळेस संपाच्या ठिकाणी, निवडणूक प्रचार सभेत रस्त्यावरून जाताना हल्लेखोरांनी जॉर्ज यांच्यावर प्राणघातक हल्ले देखील केले. त्यात जॉर्ज बऱ्याच वेळा जबरी जखमी व्हायचे. बेस्ट कर्मचाऱ्यांच्या संपाच्या वेळी २५ जुलै १९५८ च्या नवाकाळच्या पहिल्याच पानावरील एका बातमीने सर्वांचे लक्ष वेधले होते. त्या बातमीतल्या एका पदवीने सर्वांचे लक्ष वेधले. ती पदवी होती 'बंद सम्राट'. ही बातमी देशभर झळकली.

सभांमध्ये जॉर्ज इतके पोटतिडकीने बोलत की ऐकणारे श्रोते त्यांच्या भाषणात स्वतःला विरघळून घेत. एका गुंडाला जॉर्जना जीवे मारण्याची सुपारी मिळते. तो जॉर्ज यांची सभा संपण्याची वाट पाहत त्यांचे भाषण ऐकतो. सभा संपल्यावर जॉर्ज आपल्या ऑफिसमध्ये पेपर वाचत बसलेले असतात. पेपरच्या पाठीमागून एक आवाज येतो. हे घ्या. पेपर बाजूला करत जॉर्ज विचारतात की, 'हे काय?' तो गुंड म्हणतो, 'मला तुम्हाला मारण्याची सुपारी दिली होती. तुम्हाला मारण्यासाठी मी

तुमच्या दोन तीन सभांना आलो होतो. तुमची भाषणे ऐकली पण मला वाटले की तुम्हाला मारणे हे बरोबर नाही. तेव्हा हे सुपारीचे पैसे तुमच्या युनियनला देणगी म्हणून ठेवा.' मुंबईतल्या हॉटेल कर्मचाऱ्यांचा संप जॉर्ज यांच्या आयुष्यातील एक अभूतपूर्व घटना होती. त्यावेळी झालेल्या संपात जॉर्ज यांना पोलिसांनी रेल्वे रूळावरून घसरत नेलं. बेदम मारहाण केली होती. जॉर्ज यांना आता निवडणुका लढण्याची लढवण्याची गरज भासू लागली. मुंबईतले तेव्हाचे काँग्रेसचे एक मोठे नेते होते स.का. पाटील. असे म्हणतात की, त्यावेळी काँग्रेस पक्षाला स.का.पाटील हे पैसे पुरवत. पाटलांकडे गुंड, पैसा, सत्ता, उद्योगपतींचे मोठे पाठबळ याची काही एक कमी नव्हती. तरी पाटील 'बंद सम्राटाच्या' झंझावाताला थोपवू शकले नाही. दीड लाख मतांनी जॉर्ज निवडून आले. वर्तमानपत्रांनी बातमी केली होती 'द जायंट किलर'.

८ मे १९७४ रोजी मुंबईत मोटरमन यांचा संप झाला. या संपात कॉम्रेड डांगेही सहभागी होते. पण हा संप फसला. काय कारण होते संप फसण्याचे? या संपात समाजवादी गटाने भाग घेतला नव्हता म्हणून. पूर्ण तयारी झाल्याशिवाय संप करू नये असे जॉर्ज म्हणत. डांगे यांचा गट म्हणत की, जॉर्ज घाबरट आहे. १९७५ साली इंदिरा गांधींनी देशभर आणीबाणी लादली. जॉर्ज यांनी आणीबाणीचा कडाडून विरोध केला. जॉर्ज भूमिगत होऊन चळवळी करू लागले. पत्रक वाटू लागले. चळवळीसाठी निधी गोळा करण्यासाठी ते एकदा तमीळनाडूच्या करुणानिधी यांच्याकडे गेले. जॉर्ज करुणानिधी सोबत चालत होते. मागे एक पोलिस आयुक्त चालत होते. करुणानिधी यांनी आयुक्तांना विचारले,पत्ता लागला का जॉर्ज यांचा? तो आपल्या राज्यात तर आला नाही ना? या प्रसंगवरून जॉर्ज यांचे वेषांतर किती बेमालून होते हे लक्षात येते. जॉर्ज यांचे वाचन अफाट होते. झोपण्यापूर्वी तासभर वाचन केल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. प्रवासात नेहमी एखादं पुस्तक त्यांच्यासोबत असे. आणीबाणीच्या काळात भूमिगत असताना जॉर्ज यांनी बडोद्यात जागोजागी स्फोट केले. ही प्रेरणा त्यांनी भगतसिंग यांच्याकडून घेतली असावी. बहिऱ्या सरकारला जागं करण्यासाठी मोठा 'आवाज' करावाच लागतो. जॉर्ज यांच्या आयुष्यात हे प्रकरण 'बडोदा डायनामाईट' म्हणून फार प्रसिद्ध आहे. या पुस्तकात त्याचे तपशील मुळातूनच वाचण्यासारखे आहे. जॉर्ज पकडले गेले त्याआधी त्यांचे धाकटे बंधू यांना पोलिसांनी पकडले. तीन दिवस उपाशी ठेवलं. बेदम मारहाण केली. त्यात त्यांचा पाय मोडला. इंदिरा गांधींनी आणीबाणीच्या नावाखाली हा जो नंगानाच चालवला होता त्याची जबरदस्त किंमत जॉर्ज यांना मोजावी लागली. संप, निवडणूक प्रचार सभा यात जॉर्ज यांना मारहाण होणे हे जणू एक समीकरणच बनलं होतं. पुढे वाजपेयींच्या सरकारात जॉर्ज काश्मीर मंत्री नंतर संरक्षण मंत्री झाले. पाच वर्षांत जॉर्ज हे सियाचीन ला १४ वेळा गेले. असे करणारे जॉर्ज हे एकमेव संरक्षण मंत्री. या फिरण्यामुळे सियाचीन मधल्या सैन्याचे मनोबल प्रचंड वाढले होते. सियाचीन मधील सैन्याला जॉर्ज यांनी खूप सुविधा पुरवल्या. अशा या 'बंद सम्राटाची' ही सुसाट प्रोफाइल फार वाचनीय झाली आहे.

पुस्तक - सुसाट जॉर्ज
लेखक - निळू दामले
पृष्ठे - २१०
प्रकाशन - राजहंस
किंमत - २५०

**- श्री. अजिंक्य रमेश कुलकर्णी**
मु./पो. - अस्तगांव, ता. - राहाता
जि. - अहमदनगर, पिन - ४२३१०७
मो:- ८२०८२१८३०८

•••

# बांगलादेशाचा धडा...

*ज्येष्ठ अभ्यासक व लेखक श्री. अभिजित जोग यांचा नुकत्याच बांगलादेश मधील शेख हसीना सरकारच्या पदच्युती संदर्भात भारताच्या परिप्रेक्षात विश्लेषण प्रस्तुत लेखात - संपादक*

बांगलादेशात काल झालेली उलथापालथ भारतालाच नव्हे तर प्रत्येक सूज्ञ, विवेकी व्यक्तीला चिंतीत करणारी आणि धोक्याचा इशारा देणारी आहे. जे काही घडलं तो विद्यार्थ्यांचा अचानक झालेला उठाव नसून, थंड डोक्याने नियोजन करून घडविण्यात आलेला घातपात आहे हे समजून घेतल्याशिवाय या घटनांचं गांभीर्य लक्षात येणार नाही.

जागतिक वर्चस्वाची असुरी महत्त्वाकांक्षा असलेल्या तीन शक्ती आज जगात संघर्ष आणि अराजक यांचं थैमान घालत आहेत, ज्यामुळे जग आज तिसऱ्या महायुद्धाच्या आणि संपूर्ण विध्वंसाच्या टोकावर येऊन उभं आहे.

यातली पहिली शक्ती म्हणजे सर्वशक्तिमान बँका आणि अतिश्रीमंत घराणी यांची 'डीप स्टेट.' अमेरिका, इंग्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या पाच 'अँग्लोफाईल' देशांमध्ये आपल्या मर्जीची सरकारे असावीत आणि त्यांच्यामार्फत संपूर्ण जगात आपण आपल्याला हवी तशी उलथापालथ आणि बदल घडवावेत अशी त्यांची योजना असते. यात सर्वांत मोठा वाटा अर्थातच अमेरिकेचा असतो. म्हणूनच डीप स्टेटच्या उमेदवार हिलरी क्लिंटन यांचा पराभव करून त्यांच्या नियंत्रणात न राहणारे ट्रम्प जेव्हा अध्यक्ष झाले तेंव्हा त्यांना मोठाच धक्का बसला. त्यानंतर कुठलाही धोका न पत्करता आपल्याला हवं तेच घडलं पाहिजे यासाठी त्यांचे प्रयत्न त्यांनी अधिकच तीव्र केले. अमेरिकेतील 'ट्रायलॅटरल कमिशन', 'कौन्सिल फॉर फॉरेन रिलेशन्स', 'बिल्डरबर्ग ग्रुप' यासारख्या 'थिंक टँक्स'च्या मार्फत ते जगात मोठ्या उलथापालथी घडवत असतात. जगातील सर्व देशांमध्ये 'होयबा' सरकारे असावीत आणि त्यांनी आपल्याला हवी तीच आर्थिक आणि राजकीय धोरणे राबवावीत असा त्यांचा आग्रह असतो. देशाचा आत्मसन्मान आणि देशहिताला प्राधान्य देऊन धोरणे आखण्याचं स्वातंत्र्य जपणारी राष्ट्रं त्यांच्या डोळ्यात काट्यासारखी खुपतात. म्हणून तर डीप स्टेटचे एक मुखंड जॉर्ज सोरोस यांनी वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या बैठकीत जाहीरपणे सांगितलं होतं की, 'भारतातील मोदींचे सरकार पाडण्यासाठी त्यांनी एक बिलियन डॉलर्सचा फंड राखून ठेवला आहे.' इतर देशांच्या कारभारात किती बिनदिक्कतपणे आणि राजरोसपणे हे ढवळाढवळ करू शकतात हेच यावरून लक्षात येतं.

जागतिक वर्चस्वाची महत्त्वाकांक्षा असणाऱ्या इतर दोन शक्ती म्हणजे जिहादी इस्लाम आणि वोकिझमच्या नावाने जगाला वाळवीसारखं पोखरणारा कल्चरल मार्क्सिझम किंवा नवमार्क्सवाद. या तिन्ही शक्तींच्या विचारधारा आणि मूल्य यात टोकाचा विरोध असला, तरीही जागतिक वर्चस्वाचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या तिन्ही शक्ती एकमेकांचा वापर करू बघत आहेत आणि म्हणून सध्या त्यांची एक महाआघाडी कार्यरत आहे.

सगळ्या राष्ट्रांनी आपली वेगळी ओळख विसरून मेंढरासारखे आपल्या मागे यावं हा उद्देश असल्यामुळे राष्ट्राला आपली ओळख ज्यातून मिळते ती संस्कृती

आणि देशप्रेम यांचा त्यांनी त्याग करावा असा या आघाडीचा प्रयत्न असतो. म्हणूनच ब्लॅक लाईव्हज् मॅटर या आंदोलनाच्या निमित्ताने युरोप अमेरिकेतील 'फाऊंडिंग फादर्स' चे पुतळे व स्मारकं उद्ध्वस्त केली गेली. काल बांगलादेशात शेख मुजीबूर रेहमान यांचा पुतळा असाच अपमानित केला गेला, हा योगायोग नक्कीच नाही. बांगलादेशाचा जन्मच मुळात बंगाली भाषा आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी झाला. कारण १९७१ साली हे सांस्कृतिक आकर्षण इस्लामच्या बंधूभावापेक्षा अधिक बलवान ठरलं. म्हणूनच बांगलादेश पाकिस्तानातून वेगळा झाला. त्या चळवळीचं नेतृत्व करणारे शेख मुजीब यांचा पुतळा उद्ध्वस्त करून आणि त्यांच्या कन्या शेख हसीना यांना पदच्युत करून आणि परागंदा होण्यास भाग पाडून जिहादी इस्लामने १९७१ चा बदला पूर्ण केला आहे.

शेख मुजीब यांची हत्या केल्यानंतर लष्कर आणि त्यांच्या बांगलादेश नॅशनल पार्टीसारख्या जिहादी विचाराच्या बगलबच्चांनी बांगलादेशाला जगातील सर्वाधिक गरीब राष्ट्रांच्या पंक्तीत आणून बसवलं होतं. त्यावेळी बांगलादेश हा इस्लामी अतिरेक्यांचा अड्डा बनला होता. पुण्यासह भारतात झालेल्या अनेक बॉंबस्फोटांची पाळंमुळं तेंव्हा बांगलादेशापर्यंत पोचत होती. २००८ साली देशाची सूत्र हाती आल्यानंतर शेख हसीना यांनी इस्लामी अतिरेक्यांना नियंत्रणात ठेवलं, भारताशी मैत्रीचं धोरण राखलं आणि देशाला गरिबीतून बाहेर काढणारी धोरणं राबवली. विशेषतः टेक्स्टाईल्सच्या उत्पादनात आघाडी घेतली. याच कारखान्यांची काल जाळपोळ करण्यात आली हा देखील योगायोग नाही.

बांगलादेशच्या स्वातंत्र्ययुद्धात ज्यांनी भाग घेतला त्यांच्या कुटुंबीयांना सरकारी नोकऱ्यात दिलं जाणारं आरक्षण या तात्कालिक मुद्यासाठी सुरू झालेलं आंदोलन हे इतकी प्रचंड उलथापालथ करण्याइतकं भडकणं शक्यच नव्हतं. कारण हसीना सरकारने २०१९ सालीच हे आरक्षण रद्द केलं होतं. त्यानंतर न्यायालयाने ते पुन्हा लागू करावं असा निर्णय दिला होता. म्हणजेच विद्यार्थ्यांचं आंदोलन सरकारविरुद्ध नव्हे, तर न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध होतं. न्यायालयानेही नुकतंच एकूण आरक्षणातून ९३% आरक्षण रद्द केलं होतं. म्हणजेच हा मुद्दा खरंतर संपल्यातच जमा होता. तरीही लाखो लोकांना ढाक्यात जमवून अराजक निर्माण करण्यात आलं. यामागे जागतिक वर्चस्ववादी शक्तींची वेगवेगळी कारणं होती.

भारताच्या भोवती असलेली पाकिस्तान, नेपाळ, म्यानमार, मालदीव ही राष्ट्रे चीनने पद्धतशीरपणे आपल्या प्रभावाखाली आणली आहेत. बांगलादेशमध्येही चीनने भारतविरोधी भावना रुजवायला सुरुवात केली होती. यात अडचणीचं ठरणारं, भारताशी मैत्री असणारं हसीना यांचं सरकार हटवणं हे त्यांचं भू-राजकीय उद्दिष्ट होतं.

भारताला अस्थिर करणं ही डीप स्टेटची उघड भूमिका आहे हे आपण पाहिलं. त्याव्यतिरिक्त, मणिपूर, मिझोराममध्ये एक ख्रिश्चन राष्ट्र असावं हे अमेरिकेचं एक भू-राजकीय उद्दिष्ट आहे. त्यासाठी बांगलादेशात भारतविरोधी सरकार असणं त्यांच्यासाठी सोयीचं आहे. म्हणूनच अनेक देशांतील हुकूमशहांशी मधुर संबंध राखणाऱ्या बायडेन यांनी शेख हसीना यांच्याबाबत मात्र, 'त्या लोकशाहीची हत्या करत आहेत' हे कारण देऊन अत्यंत कठोर भूमिका घेतली.

सेक्युलर भूमिका घेणाऱ्या आणि भारताशी मैत्री राखणाऱ्या शेख हसीनांचं सरकार, हा बांगलादेश पूर्णपणे अतिरेकी इस्लामच्या प्रभावाखाली जावा ही इच्छा असलेल्या जिहाद्यांच्या मार्गातला मोठा अडथळा होता. शेख हसीना यांच्या पदच्युतीनंतर बांगलादेशात 'जमाते

इस्लामी' या अतिरेकी संघटनेचं महत्त्व खूपच वाढलं आहे. यामुळे तिथल्या हिंदूंच्या सुरक्षेला मोठाच धोका निर्माण झाला आहे.

या तिन्ही शक्तींनी आरक्षणविरोधी आंदोलनाचं निमित्त करून हसीना सरकारचा बळी घेतला. त्यांचा मूळ उद्देश बांगलादेशने आपली वेगळी ओळख आणि स्वतंत्र धोरणं सोडून देऊन वर्चस्ववादी शक्तींचं जू मानेवर घ्यावं हाच होता. अन्यथा बंगबंधू शेख मुजीब यांचा पुतळा पाडणं, टेक्स्टाइल्सच्या कारखान्यांची नासधूस करणं यांचा आरक्षणाच्या प्रश्नांशी काहीच संबंध नव्हता.

डावे आणि जिहादी यांना हाताशी धरून, २०२४ मध्ये भारत आणि बांगलादेशात होणाऱ्या निवडणुकांमध्ये तिथली राष्ट्रवादी सरकारे उलथून टाकायची डीप स्टेटची योजना होती. यानुसार पैसा आणि प्रचार यांचा मोठा पाठिंबा त्यांनी विरोधी पक्षांमागे उभा केला होता. हे साध्य न झाल्यामुळे काही ना काही कारणाने आंदोलने सुरू करून अराजक आणि विध्वंस यांचं थैमान घालण्याची योजना आखण्यात आली आहे. केजीबीचे वरिष्ठ अधिकारी युरी बेझमेनॉव्ह यांनी कधीच सांगून ठेवलं आहे की, अशी विध्वंसक आंदोलने ही कधीही जनतेचे 'उत्स्फूर्त उठाव' नसतात. ती कडव्या डाव्या गटांनी योजनाबद्धरीतीने घडवलेले उठाव असतात. यात बांगलादेशच्या सरकारचा बळी घेण्यात त्यांना यश आले आहे.

भारतातही हेच प्रयत्न होणार आहेत. राहुल गांधींनी निवडणूक प्रचारादरम्यान देश में आग लगने जा रही है' असं विधान केलं होतं. आजही जातीजातीत संघर्ष भडकविण्याचे प्रयत्न सुरूच आहेत. निवडणूक निकालांनंतर योगेंद्र यादव यांनी 'लोकशाहीचं रक्षण संसदेत नाही तर रस्त्यावर होतं, आता रस्त्यावर 'रेझिस्टन्स मूव्हमेंटस सुरू व्हायला पाहिजेत' असं वक्तव्य केलं होतं. त्याआधी युपीए कालीन 'नॅशनल डव्हायजरी कौन्सिल'चे सदस्य हर्ष मंदेर यांनी 'न्याय अब अदालतों में नहीं, सडकों पर होगा' असं जाहीर विधान केलं होतं. ही विधाने हलक्यात घेऊन चालणार नाही. तर जगात घडणाऱ्या घटनांचे डॉटस् या विधानांशी जोडून अत्यंत सावध राहण्याची गरज आहे. अचानक सुरू होणाऱ्या, भावनांना हात घालणाऱ्या कुठल्याही आंदोलनामागचा मूळ हेतू ओळखून, डोकी जागेवर ठेवून देशहित नेमकं कशात आहे याचं भान राखणं गरजेचं आहे. कारण आपला सामना सर्वशक्तिमान अशा निरंकुशतावादी शक्तींशी आहे. आणि आपल्या बाजूने फक्त आपणच आहोत !

**– श्री. अभिजित जोग**
पुणे
भ्रमणध्वनी – ९८२२० ४१७४६

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन–अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# प्रा. श्रीराम पुजारी जन्मशताब्दी : अनुभूती

*रसिकाग्रणी प्रा. श्रीराम पुजारी जन्मशताब्दीचा शुभारंभ झाला आहे. त्या श्रेष्ठ रसिकाग्रणीच्या स्मृतींना वंदन करणारा ज्येष्ठ साहित्यिक श्री. प्रमोद बापट यांचा लेख - संपादक*

कालपरवा वसंत बापटांच्या हृद्गतकवितेतून त्यांच्या आणि रसिकाग्रणी प्रा. श्रीराम पुजारी सर आणि समकालीन (मंगेश पाडगांवकरांचा उल्लेख आहे) प्रतिभावंतांच्या मैत्रीचं तलावातील चांदण्यासारखं तरल, अंतरार्द्र दर्शन घडलं.

पाडगांवकरांनी सांगितलेली एक आठवण इथे सांगण्याचा मोह होतो आहे.

पुजारी सर मुंबईत आले होते. कामे निपटून शीवला पाडगांवकरांकडे शिरले. तिथे भोजनासह काव्यशास्त्र-विनोदात दुपार व्यतीत केल्यावर त्यांनी पाडगांवकरांना विचारलं की, 'संध्याकाळी काय करताय?' कदाचित मित्रसंगाच्या मोहाने ''तुझ्यासाठी वेळच वेळ!'' असं पाडगांवकर उत्तरले. संध्याकाळी दादरच्या शिवाजी मंदिरात कुमारजींचं गाणं होतं. मैत्रीचं तिसरं पान !

ओलागच्च पावसाळी दिवस होता, मित्रद्वय शिवाजी मंदिरात जेमतेम वेळेत पोहोचले. त्यामुळे आधी भेटणं हुकलं. गाणं सुरू झालं, अर्थातच कुमारगायकीचा सर्व वैशिष्ट्यांनी रंग चढत गेला. सभागाराच्या मंद प्रकाशात केवळ चिद्धनचपल कुमारस्वरांची लखलख होती. मिटल्या प्रकाशातील भरून आलेल्या आभाळात विजेचं झगझगीत नर्तन असावं तसं काहीसं..

''एकला नयनाला विषय तो जाहला...'' अशा तन्मयतेने कानेटकर म्हणत तसा श्रोतृवृंद एकदिठीने आनंदमग्न होता. मध्यविराम झाल्यावर सभागृहातील दिवे लागले तेव्हाच अवतीभवती पाहण्याचं भान आलं, दिसूही लागलं.

पाडगांवकर आणि पुजारी सर चकित होऊन पहात राहिले. थोडे अस्वस्थही झाले. त्या पूर्ण प्रेक्षागृहात केवळ वीस-बावीस श्रोते होते! विरामकाळात व्यासपीठामागे रंगपिठात जाऊन कुमारजींना भेटण्यास दोघांचं मन धजावलं नाही. मंद उजेडात काजव्यांसारखे चमकणारे जेमतेम चाळीसेक डोळे अधेमधे पहात दोघांनी कातर मनानेच उत्तरार्ध ऐकला. कुमारजींच्या स्वराला मात्र त्याचा संसर्ग नव्हता. काळोख्या आकाशात चंद्रबिंब जसे न काजळता अधिक रमणीय दिसते तसा त्यांच्या स्वरांचा अलांच्छित चंद्रमा चांदणसुख देत होता. ''प्रभू अजि गमला...'' च्या भैरवीसुरांनी बैठक सुखतृप्त झाली. तानपुरे स्तब्धावले. कुमारजींनी वहीचं पान मिटलं. समोरचा पडदाही दोन्ही बाजूनी सरसरत मिटून गेला.

ह्या दोघांना थोडं सुटल्यासारखं वाटलं. त्या अत्यल्पांच्या समुदायात राहणं, त्यांच्याशी आपला बंध असणं त्यांना नकोसं झालं होतं. ती रिक्त आसनं ओरखड्यासारखी अपमानित करीत होती. आणि आता मित्रभेटीची ओढही लागली.

परस्परांशी न बोलताच त्यांनी ठरवून टाकलं होतं ह्या दुखऱ्या रिक्ततेला संभाषणात डोकावू द्यायचं नाही. झोंबलेली उपेक्षा अधिक अणकुचिदार होईल. आपले मित्रच आपल्या अपमान, उपेक्षेचे साक्षी झालेले कुमारला अधिक खुपेल.

दोघं व्यासपीठावर पोहोचले. कुमारजींचे संगतकार वाद्ये आवरत होते. सार्थक सस्मित मुद्रेने कुमारजी भेटणाऱ्या रसिकांना भेटत होते, बोलत होते. त्यांना

(पृष्ठ क्र. १३ वर)

श्वासानेही तुटतील, नाहीतर वज्राघातेनेही तुटणार नाहीत..

# ज्येष्ठ कवी ग्रेस यांना पत्र

*मराठीतील ज्येष्ठ कवी माणिक गोडघाटे अर्थात कवी ग्रेस यांना युवा कवी व गीतकार श्री. श्रीपाद जोशी यांनी लिहिलेलं पत्र लेखरूपाने - संपादक*

पुस्तकांचा ढीग समोर पडलाय. खोली अस्ताव्यस्त आहे. पोटात भुकेचा आगडोंब उसळलाय. खूप दिवसांनी तब्बल ३ तासांची संध्याकाळी झोप लागली. संध्याकाळची झोप बधिरता आणते मला. प्रचंड थकवा आलाय. हा थकवा फक्त शारीरिकच नाहीये मानसिकसुद्धा आहे. ही शून्यता आणि सुन्नता कुठेही घेऊन जाऊ शकते मला. मला कुठेच जायचे नाहीये. कोण ओढत नेते मला आणि कुठे? परवा 'निरंजनला' लग्नाळू जोडपं भेटलं... सृजनाच्या झऱ्याबद्दल बोलत होतो. 'सृजनाचे झरे खुणावतात, त्रास देतात' म्हणालो. हल्ली माझी तंद्री लागत नाही. लागलीच तर प्रचंड वेदना देते. ३० मिनिटे बोलत बसलो असेन जोडप्याशी. खूप उदाहरणं दिली मी त्यांना. तुम्ही भेटलात त्या ओळीपासून सुरवात केली.

पक्ष्यांची घरटी होती, ते झाड तोडले कोणी?
एकेक ओंजळीमागे असतेच झऱ्याचे पाणी...

ह्या ओळी वाचताना आजही मला डिप्रेशन येतं ग्रेस. डिप्रेशनला चटावलेल्या तुमच्या पेशी अन् पेशी आणि सृजनाच्या झऱ्याचा त्रासदायी खळाळ मी तुमच्या डोळ्यांत पाहिला आहे. तुम्ही म्हणाला होतात जीएंच्या स्मृतिदिनी, अगदी ठामपणे, ''पुढचा जन्म मागणार नाही.. नाही.. मला फिजिकलच दुःख होतं...'' तुमच्या ह्या फिजिकल दुःख होण्याच्या वाक्यानंतर लगेचच मी तुम्हाला आलेल्या मानसिक थकव्याला वर्गीकृत करू शकत नसलो, तरी शारीरिक आणि मानसिक थकवा ओळखण्याइतपत शहाणपण तुम्ही मला 'दीनानाथ' मध्ये असताना संध्याकाळी ६ वाजता शून्यात जाऊन दिलं आहे. मला काहीतरी सांगायचंय तुम्हाला. ह्या जन्मी सांगून होईल की नाही माहीत नाही! मला तुमची भीती वाटत नाही ह्याचं दुःख आहे. मला मिठीत का घेतलंत..? हे मला झेपणारं नव्हतं ह्याची जाण असतांनाही..?

तुमच्या कुठल्याच ओळींचे, कवितांचे मी स्वतः, 'मुलं परीक्षेला गाईड वापरतात तसं स्वत:चं गाईड होऊ देणार नाही' हे ठामपणे ठरवलं असतानाही काल तुम्ही भेटलात त्या २ ओळींवर रेंगाळलो. रेंगाळलो कसला; त्या दोन ओळींवर बोलायला लागलो. मी नव्हतोच बोलत, तुम्ही बोलत होतात हे मला माहीतच आहे! झाड तोडल्याचं दुःख उरत नाही आपल्यात..

पक्ष्यांची घरटी होती, ते झाड तोडले कोणी?
एकेक ओंजळीमागे असतेच झऱ्याचे पाणी...

आपण त्या दुःखाच्या मुळाशी जातो. आणि मग आलेला मानसिक थकवा. मी मुळात हा थकवा ३ दिवसांपासून सोबत बाळगत होतो. जखमेला धक्का लागून रक्त भळभळावं तशा ह्या दोन ओळी आठवल्या आणि आजची ही न झेपणारी सुन्नता अंगणात येऊ धजलीय. झाड तोडलं गेल्याचं दुःख बाजूला न राहताही आपण खूप मागे मागे जातो ग्रेस. पक्ष्यांच्या घरट्याचं दुःख अंगावर यायला लागतं.. ती पिल्लं, ती अंडी, ती काडी काडी जमवून केलेला 'घरौंदा'... आणि हे सगळं नेस्तनाबूद झाल्याचं दुःख/डिप्रेशन थोडं आहे की काय म्हणून तुम्ही दुसरी ओळ लिहिता..?

''एकेक ओंजळीमागे असतेच झऱ्याचे पाणी...''

झाडाच्या मुळाशी, फांद्यांशी, पानांशी, फळाशी इतकंच नव्हे; काडी काडी जमवून घरटं बांधणाऱ्या घराशी आणि या सर्वांच्या उगमाशी मला तुम्ही घेऊन जाता आणि तिथेच सोडून देता..? दुसरं सूत्र बोलताना आठवलं होतं ज्याचा मी उल्लेख केला नाही; पण आत्ता करतो..

''मन कशात लागत नाही
अदमास कशाचा घ्यावा
अज्ञात झऱ्यावर रात्री
मज ऐकू येतो पावा..''

हा 'अज्ञात झरा' आणि 'ओंजळीत पाणी असलेला झरा' ही सुसूत्रता माझ्या लक्षात येता येता निसटली व मी वेळेअभावी निसटू दिली. ज्यांच्याशी बोलत होतो त्या जोडीला केळवणाला बोलावलेलं होतं पाहुण्यांकडे. 'अधिक मास उलटून गेलाय' म्हणण्याचा थिल्लरपणा मी केला नाही ग्रेस.

मुद्दा हा आहे की, झाडाच्या मुळाशी जी पाण्याची ओंजळ ओतली गेलीय त्या ओंजळीचं दुःख, त्या पाण्याचं दुःख, त्या झऱ्याचं दुःख हे सगळं क्रमाने समोर येत होतं. एक झाड तोडल्याने इतकं मोठ्ठं दुःख तुम्ही दोन ओळीत मांडून मोकळे झालात! काल त्या झाडाच्या दुःखाशी सलगी करण्याचा शहाणपणा मी केलाय हे सांगण्यासाठीची ही आजची 'रोजनिशी'. तुम्ही लादलेल्या डिप्रेशनमधून बाहेर पडण्याचा आणखी मार्ग कुठला असेल..?

भरदिवसा उजेड असता पाऊस अंगणी आला
अंधार पसरता भवती मज दूर घेऊनी गेला
अदृश्य पसरली छाया दुःखाची माझ्याभवती
प्राणाच्या वाती करुनी मी म्हणतो शुभंकरोती...

**– डॉ. श्रीपाद अरुण जोशी**
सहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग
सी टी बोरा महाविद्यालय, शिरूर – पुणे

(पृष्ठ क्र. ११ वरून – **प्रा. श्रीराम पुजारी जन्मशताब्दी : अनुभूती** )

गोविंदराव पटवर्धनांच्या खांद्यावरून मागे पाडगांवकर–पुजारी सर दिसले. कमळ फुलावं तसं मोकळं स्निग्ध हास्य त्यांच्या मुद्रेवर उमलून आलं. ''सोलापूर–सायन जोडराग ?? कधी आले ? आत का नाही आला ? मध्यंतर मोकळं गेलं... आधी का नाही भेटला ?''

कुमारजी त्यांच्या चपळ शैलीत किती प्रश्न विचारते झाले. दोघांनी एकमेकांकडे बघत न बोलता ठरवलेलं मत घट्ट केलं आणि ''कालच आलो, गाण्याला यायचं अचानक ठरलं. गाण्याची मोहिनी.....'' वगैरे विषयावर संभाषण नेलं.

कुमारजी अंतरंग मित्र होते, मित्रांचे अंतर जाणत होते. ''काही घडलंय का ? अचानक आला... आणि चेहेऱ्यावर असं आभाळ आलेलं... काय झालं?'' त्यांनी काळजीच्या स्वरात विचारलं. आता दडवण्यात अर्थ नव्हता. कप्पा उघडा पडला होता. पुजारी सरांनी जपून जपून प्रेक्षगारातलं ठणकतं वास्तव सांगितलं, व्यथा सांगितली.

त्यावर वात लावल्यावर कोनाडा उजळून जावा तसं हसत कुमारजी म्हणाले, ''इथे बाहेर बघून कोण गातो ? 'आत' सुरांची एवढी गंमत चालली असताना.. त्यांच्यातच होतो ना मी !''

पाडगांवकर एखादी कविता सुचताना... अवतरताना दिसावी असे डोळे विस्फारून पहात राहिले आणि पुजारी सरांनी कुमारजींच्या 'त्या' प्रवासाची अनुभूती घेण्यासाठी डोळे मिटून घेतले.

पुजारी सरांच्या जन्मशताब्दीचा शुभारंभ झाला आहे. त्या श्रेष्ठ रसिकाग्रणीच्या स्मृतींना वंदन.

**– श्री. प्रमोद वसंत बापट**


---

एखाद्याची सर्वांत मोठी चूक म्हणजे त्याचे वास्तविक स्वरूप ओळखणे नाही आणि
केवळ आत्मज्ञान आत्मसात केल्याने ते सुधारले जाऊ शकते!

# सीता - जशी असायला हवी तशी

*ज्येष्ठ लेखक व दिग्दर्शक अभिराम भडकमकर यांनी रामायणातील सीतेवर लिहिलेली कादंबरी सध्या गाजत आहे. त्यावर ज्येष्ठ स्तंभलेखक श्री. राजेश कुलकर्णी यांनी केलेले पुस्तक परीक्षण प्रस्तुत लेखात आहे - संपादक*

मध्यंतरी अभिराम भडकमकर यांचे लेखन असलेल्या 'रघुवीर' या चित्रपटाबद्दल लिहित असताना त्यांची 'सीता' ही कादंबरी वाचायला घेतली. अखेरची कादंबरी पूर्णपणे केव्हा वाचली होती हे आठवत नाही. त्यांचीच 'इन्शाअल्ला' ही कादंबरी तुकड्यातुकड्यात वाचली होती. तीदेखील आता पूर्ण करेन. ही थोडी उलटी गंगा होईल खरी.




स्वत:ला स्त्रीवादी म्हणवणाऱ्यांनी श्रीरामाला लक्ष्य करण्यासाठी सीतेचा अतिशय सवंग वापर केलेला आहे. स्त्रीवादी आहोत हे दाखवणाऱ्या पुरुषांची स्थिती आणखी गंमतीशीर असते. आपण पुरुष असूनही 'तसे' आहोत हे सिद्ध करण्यासाठी अशी मंडळी अनेकदा दुसरे टोक गाठत असताना दिसतात! मध्यंतरी तर एका स्त्रीवादी म्हणवणारीने 'जणू सीता पुरेनाशी झाली, म्हणून उर्मिलेकडे का दुर्लक्ष केले', यावरून कांगावा सुरू केल्याचे पाहण्यात आले होते. अशा उथळपणाला प्रसिद्धी देणारेही आहेत. त्यातच अनेक ऐतिहासिक व्यक्तिरेखांवरील डोक्यावर घेतले गेलेले लिखाण प्रत्यक्षात अतिशय बेजबाबदार असल्याची आणि त्यातून प्रत्यक्षात मुरमाची मूर्ती घडवण्याचे व तिचे उदात्तीकरण करणारे असल्याची उदाहरणे देखील पाहण्यात आहेत. अशा परिस्थितीत सीतेवरील आणखी एक कलाकृती ही खरे तर उत्साह वाढवण्यासारखी घटना वाटली नव्हती. उलट या सर्व कारणांमुळे सीता ही लिखाणासाठी स्त्रियांची मक्तेदारी समजली जात असताना एका पुरुषाने तिची बाजू कशी हाताळली, ही बाब खरे तर धडकी भरवणारी होती. मात्र या कुतूहलापेक्षा 'इन्शाअल्ला' या कादंबरीचे लेखक म्हणून त्यांची ही कादंबरी वाचायला घेतली.

वाल्मीकी रामायण वाचून बराच काळ लोटला. सर्वसाधारणपणे प्रत्येक प्रसंगातील संवादांचा भाव स्मरत असूनही प्रत्यक्ष संवाद आठवण्याबाबत अडचण असल्यामुळे आता ही कादंबरी हाती घेतल्यावर एक अडचण अशी झाली की, या कादंबरीतील संवाद अभिराम यांचे आहेत, की प्रत्यक्ष वाल्मीकी रामायणातले आहेत? हे समजणे कठीण. मात्र अगदी सुरुवातीच्या वाल्याकोळी आणि नारदमुनी यांच्यातले सुंदर संवाद किंवा शुभकार्यात राक्षसी शक्तींनी विघ्ने आणण्याचे वर्णन वाचल्यावर ठरवले की, जे आहे ते अभिराम यांचे आहे असे समजून वाचायचे; अन्यथा पदोपदी संभ्रम निर्माण व्हायचा! पुढे विमनस्क झालेल्या दशरथाला सीता, 'तुम्ही नक्की वर काय दिला होता?' असा जो प्रश्न विचारते, 'त्यामागचा लेखक'

स्पष्टपणे दिसतो. सीतेचे दाखवलेले हे प्रसंगावधान निव्वळ किमान तर्कावर आधारित गाळलेल्या जागा भरणारे ठरते. अन्यथा विवाह होऊन आलेली सीता 'डोक्यावर तुळशीवृंदावन घेतल्यासारखी' वनवासाला निघाली, हे चित्र तिच्या व्यक्तिमत्त्वावर अन्याय करणारे ठरले असते. शिवाय जनकासारख्या राजाचे अपत्य असलेली सीता मेषपात्र - रडतराऊ कशी असेल? ती राजाच्या दरबारातील गुणवान मंडळींच्या तालमीमध्ये गुणसंपन्न बनलेली असणारच. त्यामुळे वनवास नशिबी आल्यावर, वनवास भोगताना, रावणाने अपहरण केल्यावर अशा प्रत्येक वेळी सीता दुर्मुखलेली कशी असेल? त्यामुळे सीतेची स्वतंत्र बुद्धी दाखवण्याचे अनेक प्रसंग लेखकाने रेखाटले आहेत, ते अशा 'तर्कावर आधारित' असल्याचे दिसते.

उत्तर रामायणाची नोंद घेण्याची गरज नाही. का ते विस्ताराने सांगायला हवे. 'सीतेला जंगलात घेऊन जा आणि तिला सोडून दे किंवा ठार कर', अशा आशयाचा आदेश रामाने लक्ष्मणाला देणे हे कोणत्या तर्कात बसते? देवदत्त पटनायक यांनी या प्रश्नातून मार्ग काढणे हे जणू आपले कर्तव्यच आहे असे समजत श्रीरामांनी सीतेला आपली ओळख लपवून आपल्या राज्यातच राहण्याची मुभा असल्याचे लक्ष्मणाकरवी सांगितल्याचे असे कथानक रचल्याचे वाचले होते. म्हणजे तिचा त्याग केला नाही असे म्हणायला ते मोकळे! हा अट्टहास कशासाठी? रामायण मालिकेतही 'मैं मिथिला वालों को कह दूंगी की अयोध्या में अपनी बेटी को न ब्याहना', असा संवाद एका दासीच्या की कोणाच्या मुखी कोंबला होता! ही तर सवंगपणापुढे शरणागती होती. शंबुकाच्या कथानकाचेही तसेच. एकीकडे रामराज्य स्थापन झाले म्हणायचे आणि शंबूक या कथित शुद्राने तप केले म्हणून त्याला श्रीरामाने ठार केले असे दाखवायला तेथे काय न संपणाऱ्या मालिकांचे दळण दळण्यासाठी प्रत्येक व्यक्तीरेखा आलटून पालटून सुष्ट आणि दुष्ट दाखवण्याची सक्ती होती? जैन रामायणात हा शंबूक शूर्पणखेचा मुलगा असल्याचे दाखवले आहे. त्यामुळे रामायणाच्या बाबतीत देशाच्या विविध भागांतील रामायणांच्या आवृत्त्यांची साहित्य म्हणून नोंद घेणे उचित असले, तरी आपण कथा मांडताना सर्व डगरींवर पाय ठेवायचे म्हटले तर कथानकात सुसंगती रहात नाही; एवढेच नव्हे तर, अशा प्रत्येक गोष्टीमागे प्रत्यक्षात काय घडले असेल याबाबत बांधलेले तर्क सांगण्याची सक्ती होते. शीलपावित्र्याचा पुरावा म्हणून रामायणात अन्यत्र अग्निपरीक्षेचा संदर्भ दिसत नाही. वालीने पळवलेल्या सुग्रिवाच्या पत्नीचा वालीचे पारिपत्य झाल्यावर पुन्हा स्वीकार करण्यास रामच सुग्रीवाला सांगतो व तो ते मानतोही. ही अग्निपरीक्षेची ब्याद उपटल्याचे तेव्हा दिसत नाही. दुसरी गोष्ट अशी की, देशभरातील व देशाबाहेरच्या प्रदेशात रामायणाची वेगवेगळी कथानके सांगितली जातात. त्यात काही वनवासी परंपरांचाही समावेश आहे. 'सीता रावणाची मुलगी' असेही एक टोकाचे कथानक आहे! शिवाय त्या काळातली दळणवळणाची साधने पाहता किती पिढ्यांमध्ये हे कथानक देशाच्या विविध भागांमध्ये पोहोचले असेल? किती जणांच्या मौखिक मर्यादांमुळे हे कथानक जसेच्या तसे पोहोचण्यात कोणत्या बाधा आल्या असतील?, रामायण ऐकूनही सीतेचे अपहरण कोणी केले हा प्रश्न पडतो का?, हे विनोदाने विचारण्याऐवजी जणू तशी वस्तुस्थितीच निर्माण व्हावी अशी परिस्थिती! हे सारे अगदी शक्य आहे. त्यातच आज लिहिल्या जाणाऱ्या 'पिवळ्या पुस्तकांना' आश्रयदाते मिळाल्याचे जसे आपण पाहतो, तसे या कथांना नवनवे पाय फुटणे अगदी साहजिक असावे! असा हा हजारो वर्षांचा कालखंड आहे. त्यामुळे या वेगवेगळ्या कथानकांमधून दिसणाऱ्या श्रीरामाच्या वर्तनातील कुसंगतींची सुसंगती लावण्यासाठी 'जनमानस'

---

हे जे जणू एक पात्रच लेखकाने निर्माण केले आहे, त्याची खरोखर गरज होती का हा प्रश्न पडतो. केवळ उत्तर रामायणाचे ठिगळच नव्हे; तर अगदी वाल्मीकी रामायणातदेखील काही कुसंगती दिसत असतील (एक संभाव्य उदाहरण खाली दिले आहे) तर त्या अशा पद्धतीने घुसडलेल्या असू शकतात ही शक्यता अधोरेखीत केली जायला हवी. म्हणजे मग कोणताही आरोप न होता किंवा होणाऱ्या आरोपांना सडेतोड उत्तर देत श्रीरामकथा किंवा सीताकथा सांगणे सोपे होईल. मुळात श्रीरामांबाबत श्रद्धाभाव असण्याचे कारण तेच आहे आणि आज इतक्या सहस्रकांनंतरचे हे 'जनमानस' खरे समजायला हवे. शिवाय तसे नसेल तर रामपंचायतनाची प्रतिमा अस्तित्त्वात येण्याचा कालखंडच उरणार नाही. हे गृहितक मान्य केले, की जे म्हटले तसे सीतेवरून किंवा सुमित्रेवरून आपल्या प्रतिभा तुटेपर्यंत, म्हणजे अतिशय विकृत निष्कर्ष निघेपर्यंत ताणतात, त्यांची चांगलीच पंचाईत होते. आमच्यासमोर जे उपलब्ध आहे त्या आधारावर; म्हणजे वाल्मिकी रामायण आणि उत्तर रामायण यांच्या खरेपणाबद्दल शंका न घेता आम्ही आमच्या प्रतिभा ताणणार असाच ताठपणा ते दाखवणार असतील, तर मग आज निर्माण झालेल्या पिवळ्या निर्मितीवरून आजपासून पाचशे-हजार वर्षांनंतर शिवाजीराजांच्या इतिहासावरून राजे आणि अफझलखान जीवलग मित्र होते असे कथानक निर्माण झाले, तर त्यावेळच्या प्रतिभाताणूंची केवढी दिवाळी होईल, हे आजच्या प्रतिभाताणूंच्या निदर्शनास आणून देता येईल! आज अर्थभ्रष्ट झालेल्या अर्थाने राजे पुरोगामी होते अशी पिवळी मांडणी आणि ते कोणाचा द्वेष करत नसले तरी हिंदूहिताबाबत चांगलेच खमके होते अशा अर्थाने झालेली मांडणी या दोन्हींचा भविष्यात समतोल साध्य करता येईल असे वाटते का? आजदेखील एखाद्या घटनेच्या खोलात न शिरता अनेक कवींना ज्या प्रकारचे उथळ संवेदनशील शाब्दिक पान्हे फुटतात हे पाहिले तर हे आणखी स्पष्ट होईल. यातले सर्वच जण स्वभावत: बदमाश असतात असे नाही; की परिस्थिती माहीत असूनही तिला आपल्या शब्दांनी भलतेच वळण द्यायचे! एखाद्या घटनेच्या फार खोलात जाऊन तिचे विश्लेषण करता येण्याची काही जणांची खरोखरच क्षमता नसते. तेव्हा अर्थाचा अनर्थ होण्यामागे अशी वेगवेगळी कारणे असणे अगदी शक्य आहे. त्यातदेखील हे जर हजारो वर्षांच्या कालावधीत घडणार असेल, तर मूळ कथानकाचे असे भ्रष्टीकरण होणार हे गृहित धरून त्यातील काही भाग सकारण झिडकारायला हवा असे वाटते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे असा भाग टाळण्याच्या स्वत: संत तुलसीदासांनी याबाबत घालून दिलेल्या आदर्शाकडे दुर्लक्ष करण्याचे कारण उरत नाही. उत्तर रामायणाची नोंद घेताना हे सारे लेखकाने अतिशय कौशल्याने नंतरच्या वाल्मीकी-नारद संवादातून निस्तरले आहे.

मूळ कथानकातल्या आधीपासून असलेल्या शंकाही तशाच अनुत्तरीत राहतात. हनुमान सीतेला शोधण्यासाठी उड्डाण करतो. तिला शोधतो. आणि ती मात्र त्याच्याबरोबर परत जाण्यास नकार देते. हा विषय केवळ सीतेपुरता मर्यादित नसून, दोन संस्कृतींमधला आहे हे म्हणायला आणि ऐकायला छान वाटते. परंतु रावणाने सीतेचे केलेले अपहरण मुळात दवंडी देऊन केलेले नसल्याने संधी मिळताच सीतेची सुखरूप सुटका करण्यात काहीही गैर नव्हते. श्रीरामाचा अवतार हा मानवी होता. त्याच्याकडे कोणतीही दैवी शक्ती नव्हती. उलट रावण व त्याच्या सेनेकडे अफाट मायावी शक्ती होत्या. तेव्हा युद्धाच्या काळात सीता सुरक्षित राहण्याची कोणाला व काय खात्री होती? शिवाय श्रीराम तिला शोधत येत असल्याच्या व वाटेत घडणाऱ्या घटनांच्या वार्ता कानावर पडत असताना सीताच म्हणालेली असते की, 'अधर्मकृत्याचा प्रतिकार श्रीराम धर्मानेच करतील असे नाही.' त्यामुळे सीतेला सुखरूप परत आणून त्यानंतर

---

जर तुम्ही तुमचे स्वप्न साकारत नसाल;
तर तुम्हाला दुसरे कोणी तरी त्यांचे स्वप्न साकार करण्यास कामाला ठेवेल.

रावणाचे पारिपत्य करणे हा पर्याय का उपलब्ध नसेल? तो तेव्हादेखील दोन संस्कृतींमधला संघर्षच ठरला असता. सीतेला आधी सोडवून नंतर युद्ध करण्याने कथावस्तुवर काही परिणाम पडला असता का? अलीकडे आपल्या वाटेल त्या थराला जाऊन सिनेमॅटिक लिबर्टी घेण्याच्या काळात युद्धामध्ये युद्धनौकेचे रूपांतर पाणबुडीत केले जाताना दिसते (खरे तर अशा स्वातंत्र्याची अशी क्षुद्रबुद्धीची आणि केविलवाणी उदाहरणे देण्याची वेळ येऊ नये), तसे सीतेला आधीच सोडवून आणल्यास त्यात फारसे नाट्य उरणार नाही म्हणून हनुमानाला केवळ तिचा निरोप घेऊन परत आणण्याचा बदल कथानकात करण्याचा प्रकार काळाच्या ओघात घडला असेल का? तिकडे जगातील सर्वांत सुंदर गणली जाणाऱ्या स्पार्टाच्या राणी हेलनला ट्रॉयचा पॅरिस पळवून नेतो की चित्रपटात दाखवल्याप्रमाणे ती त्याच्याबरोबर पळून जाते; त्यावरून होणाऱ्या युद्धाच्या कथेबाबतदेखील तिकडे इतक्या वेगवेगळ्या परस्परविरोधी कथा प्रचलित आहेत की, नक्की काय झाले असावे यावरून आपल्या काव्यात नेमकी काय रचना करावी? हा प्रश्न त्या अंध होमरलाही पडला असणार. शिवाय तो अंध असल्यामुळे त्याच्या कानावर यातले काय काय पडले असेल, हा आणखी एक प्रश्न! त्यामुळे अशा शंकांचे निरसन होणे शक्य नाही.

अशा कथेवर लिहिताना मर्त्य मनुष्याचे मनुष्यपण आणि त्यातही कर्तृत्ववान मनुष्याचे मनुष्यपण दाखवताना चमत्कारांवर अवलंबून रहायचे नाही असे म्हटले तरी ते राजघराण्यातल्या पात्रांपुरतेच उरते. कारण हनुमान आणि त्यातही रावणाची संपूर्ण बाजू हे सारे चमत्कारानेच भरलेले आहेत. एखाद्याची सावली पकडून त्याला जेरबंद करणे ही खरोखर उच्च प्रतिभेची कल्पना आहे आणि मला त्या कल्पनेचे बऱ्याच आधीपासून आकर्षण वाटत आले आहे. हनुमान योगपुरुष आहे हे त्यातले वेगळेपण. मात्र त्यामुळे सीतेला शोधण्यासाठीचे हनुमानाचे उड्डाण, त्यात त्याच्यावर आलेली संकटे या साऱ्याला पर्याय शोधणे शक्य नसते. श्रीरामाच्या बाजूच्या कोणालाच चमत्कारांचा किंवा अशा सामर्थ्याचा फायदा द्यायचा नाही म्हटल्यावर कथा तेथेच खुंटली असती. सेतु बांधला जात आहे हे कळल्यावरच युद्धाला तोंड का फुटले नाही, असा आणखी एक प्रश्न असतो. या कथानकातला आणखी एक योगायोग म्हणजे; रावणाचे पारिपत्य होणे आणि वनवासाचा कालावधी एकाच वेळी संपणे. अन्यथा रावणाच्या पारिपत्यानंतर तिकडे बिभीषण राजा बनला आहे आणि इकडे मुक्त केलेल्या सीता आणि लक्ष्मणासह श्रीराम पुन्हा वनवासात; अशी विचित्र स्थिती उद्भवली असती. असो. या मर्यादांमध्येच काम करावे लागते हे खरे.

पल्लेदार वाक्ये आणि संस्कृतप्रचूर शब्दांचा सढळ वापर आणि तथाकथित वातावरणनिर्मितीसाठी अशाच शब्दांचा खच पाडणे ही लेखकाची शैली नाही, हे फार बरे आहे. सुटसुटीत; मात्र चपखल शब्दांचा वापर ठायीठायी दिसतो. हे कथानक सीतेच्या दृष्टीने आहे म्हटल्यावर राम-लक्ष्मणाच्या लंकेकडे येण्याच्या प्रगतीबाबतच्या वार्ता तिच्या कानावर पडण्याची म्हणजे आपल्याला कळण्याची 'व्यवस्था' लेखकालाच करावी लागते. त्याव्यतिरिक्त अनेक घटनांबाबत 'वरवर दिसते तसे नसते हेच वास्तव असते' हे ओळखून त्या-त्या घटनांमागचे संभाव्य तपशील सांगण्यासाठी लेखकाने विकटकीर्ती आणि छद्मभूर्ती ही पात्रे योजली आहेत. आर्चड्यूक फर्डिनांड याचा खून होणे अशा त्रोटक पद्धतीने पहिल्या महायुद्धाचे कारण सांगितले, तरी प्रत्यक्षात हे महायुद्ध भडकवण्यास प्रत्यक्षात किती विकटकीर्ती आणि छद्मभूर्ती कारणीभूत होते हे त्याबद्दलचे तपशील वाचल्यावर कळते. त्यातही विकटकीर्तींची पोहोच साक्षात रावणापर्यंत. त्यामुळे अनेक घटनांचे विश्लेषण रसभंग न

होता विनाठिगळ (सीमलेस) होते. पुढे विकटकिर्ती आणि प्रहस्त यांच्यातील संवाददेखील त्यामुळे घडवला जाऊ शकतो. सीता आणि मंदोदरी यांच्या भेटीचा प्रसंग लेखकाने कमालीच्या संयमाने हाताळला आहे. अन्यथा चित्रपटसृष्टीतील काही भ्रष्टमती लोकांनी हा प्रसंग कसा रंगवला असता, हे सांगण्याची गरज नसावी.

लेखकाचे अभिनंदन यासाठी करायला हवे की, रामायणासारखे मातब्बर कथानक हाताशी असताना स्त्रीवादाच्या नावाने एव्हाना परिचित झालेली चिकित्सेच्या नावाखालची कांगावखोर शैली त्याने पूर्णपणे टाळली आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे मुख्य कथानकातील अखेरचा लोकापवादाचा भाग तसाच ठेवण्याचा मोह त्याला टाळता आला नसल्यामुळे आणि येथे सीतेच्या दृष्टीने पहायचे असल्यामुळे ही कथा एक मोठी शोकांतिका (ग्रेट ट्रॅजेडी) ठरण्याची शक्यता निर्माण होते. लेखकाने तसे स्पष्टपणे रंगवलेले नसले तरी! असे असले तरी लेखकाने सीता निश्चितपणे 'सीता वाटायला हवी' अशा पद्धतीने समोर आणली आहे, याचे प्रत्यंतर संपूर्ण कादंबरीमध्ये येते हे नक्की.

**– श्री. राजेश कुलकर्णी**

•••


**दिशा**
**नियमित वाचा.**

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*


## *चिंतन*

**संस्था ही कोणतीही असो,**
**सरकारी, सहकारी,**
**खाजगी वा धर्मार्थ,**
**संस्थेत ठरावीक काम करणे,**
**हा झाला कायदा.**
**पण कामात स्वतःला झोकून देणे,**
**ही झाली नैतिकता.**
**मी पगार घेतो म्हणून काम करतो,**
**हा झाला व्यवहार.**
**संस्थेच्या अस्तित्वाची,**
**सुरक्षिततेची, प्रतिष्ठेची**
**योग्य काळजी घेण्याचे कार्य**
**मला पार पाडावयाचे आहे,**
**ही झाली आपुलकी.**
**संस्थेची प्रगती आहे तोवर माझे**
**अस्तित्व कायम आहे.**
**माझी प्रतिष्ठा आहे म्हणून संस्थेला**
**हानिकारक ठरेल,**
**अशी कृती मी कधीही करणार नाही.**
**पण सामाजिक ऋण**
**फेडण्याच्या भावनेने,**
**स्वतःला कामात वाहून घेईन.**
**ही प्रत्येकाची भावना असली पाहिजे,**
**यातच देशाचा विकास व**
**स्वतःचा उद्धार आहे.**

# उंटांची अद्भूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... - संपादक*

**साद्री :**

रबारी किंवा रायका यांत दोन प्रकार आहेत. मारू रायका व चालकिया रायका. मारू रायका जास्त वरच्या श्रेणीचे समजले जातात. ते चलकियांच्या मुलींशी लग्न करतात. पण आपल्या मुली त्याच्याकडे देत नाहीत. फक्त उंटांमध्ये व्यवहार करतात. चलकिया रायका मुख्यतः शेळ्या व मेंढ्यांचे मोठे कळप पाळतात. ते मोठ्या संख्येने गोदवारमध्ये राहतात. त्याच्या बायका पितळ्याचे दागिने घालतात. म्हणून त्यांना 'पितालिया' असेही म्हणतात. (castes of Marwar) census report of 1891.

**February 1991 :**

ती जोधपूरमध्ये, घुमर टुरिस्ट बंगल्यात उतरलेली असते. तिथल्या मॅनेजरला ती सांगते की, तिला चांगल्या ड्रायव्हरची गरज आहे. आत्तापर्यंतचा तिचा ड्रायव्हर बद्दलचा अनुभव चांगला नसतो. ते कधी येतच नाहीत, तर कधी उशीरा येतात, तर कधी पैशावरून वाद घालतात.

आदल्या दिवशी रात्री ती बिकानेरहून जोधपूरला टुरिस्ट बसने आलेली असते. तिला साद्रीला डॉ. देवाराम देवासीला भेटायला जायचे असते. टुरिस्ट बंगल्याच्या बाहेर नवीन कोऱ्या अँबेसिडर गाड्यांचा ताफा उभा असतो. मॅनेजर एका ड्रायव्हरला घेऊन येतो. तिला तो असाधारण वाटतो. कुठेतरी तिला मनातून वाटते की, हा ड्रायव्हर तिला लाभदायक ठरेल.

राजस्थानातील प्रसिद्ध व मुख्य दोन पूर्वीची राज्ये म्हणजे मारवाड व मेवाड. मारवाड म्हणजे मृत्यूचा प्रदेश, कारण तो प्रांत मुख्यत्वे सपाट भीतिदायक वाळवंटाचा आहे. जोधपूर त्याची राजधानी व राजाच्या राज्यकारभाराचे आसन होते.

त्यांचा प्रवास डोंगराळ व जंगल असलेल्या मेवाडकडे चालू होतो. जो उदयपूरच्या महाराणाचा प्रांत असतो. शंभर कि.मी. गेल्यानंतर ते मुख्य रस्ता सोडून लहान रस्त्याला लागतात. क्षितिजावर आरवलीच्या डोंगरांचे अंधुक छायाचित्र दिसू लागते. भौगोलिक दृष्ट्या आरवली पर्वत राजस्थानच्या उत्तर पूर्वेकडून नागमोडी वळण घेत दक्षिण पश्चिमेकडे जातो व थरचे वाळवंट व एक कुबडाच्या उंटाचा प्रजननाचा प्रदेश येथील पूर्वेकडची सीमा तयार होते.

त्यांनी मारवाडचे वाळवंट पार केले व ते गोदवारला येतात. हा अरवलीच्या पायथ्याचा प्रदेश सुपीक व सौम्य हवामानाचा आहे. त्यामुळे दोन्ही राज्ये ह्या प्रदेशावर स्वामित्व सांगत. खेजरी व बाभळीच्या झाडांची गर्दी वाढते. पिंपळही दिसू लागतात. बुजगावणे असलेली हिरवी शेतेही दिसू लागतात. गावांच्या वेशीजवळ आल्यावर फळबागा व किरमिजी रंगाच्या बोगनवेली रस्त्याला लागून असलेल्या भिंतीवर उंच चढलेल्या दिसू लागल्या.

सूर्य अस्ताला जात होता व त्याच्या सौम्य पण तेजस्वी प्रकाशात सगळा परिसर नाहून गेला होता. अशा वातावरणात ते साद्री या छोट्याशा डोंगरांच्या रांगेत असलेल्या गावात येतात. भाजी मार्केट पार करून

---

मी विशिष्ट प्रदेशाचा, देशाचा ही भावना गळून पडण्यासाठी ताऱ्यांकडे बघा;
कारण तेव्हा तुम्ही एका अवकाशाचे झालेले असता.

ते पशुवैद्यकीय हॉस्पिटलच्या मोठ्या इमारतीपाशी येतात. बरेच दिवसांनी भेटलेल्या नातेवाईकासारखे डॉ. देवाराम त्यांचे स्वागत करतो.


त्याच्याकडे आणखी एक पाहूणा दिल्लीहून आलेला असतो. त्याचे नाव विनय श्रीवास्तव असते. तो मानववंश शास्त्रांचा विद्यार्थी असतो. त्याचे रायकांवर संशोधन चालू असते. रायका व त्यांचे उंट या संबंधी प्रत्यक्ष जागेवर भेट या संबंधी त्या दोघांनी मिळून पुढच्या काही दिवसांचा आराखडा आखलेला असतो. विनय सांगतो की, येथे गोदवालमध्ये चलकिया रायका मोठ्या संखेने आहेत. ते मारू रायकांशी लग्न करत नाहीत. त्याची फेटा बांधण्याची पद्धत व त्यांच्या चालीरीती मारू रायकांपेक्षा वेगळ्या असतात. पण ते एकाच थाळींतून जेवतात.

कमल कोठारींनी सांगितलेली माहितीच विनय देतो. रबारी हे सर्वसाधारण नाव आहे. गुजराथमध्ये जास्त रबारी आहेत. ते जास्त जनावरे पाळतात. रायका या नावाने मारवाड मधील रबारी ओळखले जातात. ते मुख्यतः उंट पाळतात व त्यांचे प्रजनन करतात व शिकलेले रबारी देवासी म्हणून ओळखले जातात. पण या सर्वांचे मूळ एकच आहे. नंतर त्याने सांगितले की, मारवाडला रायका जैसलमेरमधून आले जे सर्वांत पश्चिमेला असलेलं शहर पाकिस्तानच्या जवळ आहे. तिथे ते बहुदा अफगाणिस्थानातून आले किंवा पर्शिया मधून आले. रायकांच्या मुळाविषयी खूप वेगवेगळी व गुंतागुंतीची मते आहेत.

तिला साद्री गाव आवडते. तेथे खूप गर्दी व घाई नसते. त्या गावाचे स्वतःचे विश्व असते. तेथे हॅाटेल्स नसतात. पण मुक्तीधामचे हॅास्टेल असते. साद्रीमध्ये रेस्टॅारंटही नसतात. एक खाणावळ म्हणजे एका भिंतीत मोठे भगदाड असते. तिथे या तिघांना बसायला कशीबशी जागा व चूल असते. मोठी ज्वारीची भाकरी त्यावर तुपाची धार, तिखट चटणी व लाल रश्यातल्या भाज्या या सर्वांने तिचे तोंड चांगलेच पोळते.

धर्मशाळेतील लहान थंड खोली किरकिरणारे लोखंडी दार, खोलीत आधीच कोणीतरी वापरलेले जाडेभरडे ब्लॅंकेट असते. तिच्या नोट्स लिहिण्याआधीच तिला झोप लागते.

दुसऱ्या दिवशी सकाळी तिला मोरांच्या आर्त ओरडण्याने जाग येते. मंदिराच्या हिरळीवर एक मोर व अनेक लांडोर नाचून एकमेंकांना आकर्षित करत होते. नंतर ते लटाडा गांवांत जातात. आठपैकी पाच रायका कुटुंब उंट पाळत होते. तेथे ते सावंतिबा रायकाला भेटतात. तो त्यांचे रामराम म्हणून उत्साहाने स्वागत करतो. त्याच्या गेरूने रंगविलेल्या झोपडीच्या अंगणात वीस उंट दाटीवाटीने बसलेले असतात. इल्स व देवारामला सावंतिबा पर्यंत पोचायला त्या उंटामधून मार्ग काढावा लागतो. देवाराम त्यांच्या येण्याचे कारण सांगतो. सावंतिबा उंच अतिशय बारीक व संपूर्ण पांढऱ्या कपड्यांत असतो.



लटाडा गावातला सावाराम रायका
नवीन जन्माला आलेल्या उंटांच्या बछड्याबरोबर.

घरातल्या चुलीतून येणारा धूर गोलाकार (चक्राकार) फिरत आकाशात पसरतो. वारा कडुनिंबाच्या झाडांमधून सळसळत होता. कळपांतील उंट हळूहळू उठायला लागतात. त्यांच्यात एक नर असतो व दोन नवीन जन्माला

आलेले उंट असतात. त्यातील एक आजूबाजूला उड्या मारण्याचा प्रयत्न करतो. दुसरा उभे राहण्याचा प्रयत्न करतो पण खाली पडतो. सावंतिबाचा नातू त्या पहुडलेल्या उंटामधून त्यांच्याकडे येण्यासाठी उंटाच्या बाहेर आलेल्या मांडीच्या हाडांचा आधार घेत मार्ग काढतो.

ते पाहून तिला परत तिचे कॅालेजचे दिवस आठवतात. त्यांना सांगण्यात आलेले असते की, मोठी जनावरे संभाव्य धोकादायक पशू असतील. मोठ्या जनावरांजवळ त्यांना बांधल्याशिवाय जाऊ नका. नाहीतर त्यांना झोपवा किंवा गुंगीचे औषध द्या. पण इथे तिला फार वेगळा अनुभव येतो. हे उंट त्यांच्या कुटुंबाचे सदस्य वाटत होते. त्यांना अतिशय प्रेमाने वागवले जात होते. कोणाला त्यांची भीती वाटत नव्हती. तिला तिचे जॅार्डनमधलेही दिवस आठवतात. नंतर साधारण एक बारा वर्षांचा मुलगा तिला उंटाच्या दुधाचा वाफाळलेला चहा आणून देतो. हे पेय अनेक तास उंटांच्यामागे फिरतांना शक्ती देणारे असते.

सावंतिबा त्या लाल फेटा घातलेल्या मुलाला त्या पडलेल्या उंटाला उभे करायला सांगतो. तो मुलगा त्या बछड्याशी बोलतो. त्याला थोपटतो. आधी बसायला व नंतर उभे राहायला मदत करतो. तो उंट धडपडत तिच्याकडे येतो. तेव्हा इल्सला समजते की काहीतरी गडबड आहे. ती सावंतिबाच्या सांगण्यावरून त्याला तपासते तेव्हा तिच्या लक्षात येते की, त्याच्यामध्ये काहीतरी जन्मतःच व्यंग आहे. जसजसा तो मोठा होईल तसा तो सुधारेल असे ती सांगते.

सावंतिबा सांगतो की, सध्या त्याच्या कळपाला खूप समस्या आहेत. अनेक गर्भपात, अपुऱ्या दिवसांचे जन्म, नवीन जन्माला आलेल्यांचा मृत्यू इत्यादी अडचणीना तोंड द्यावे लागते आहे. त्याच्यामते गर्भपात, कदाचित कळपाला नुकत्याच झालेला खोकला व निमोनियामुळे असणार. सावंतिबाच्या भावाचा एक उंट आदल्या दिवशीच अचानक मरतो. तो कशामुळे मेला हे समजत नाही. ती सुचवते की त्या उंटाचे काही नमुने (सॅम्पल्स) घेऊन लॅबोरोटरीत पाठवा. पण देवाराम सांगतो की तिथे जवळपास अशी लॅब नाही व मेलेल्या प्राण्याला हे लोक हात लावत नाहीत.

सावंतिबाची व त्या तिघांचीही निघायची वेळ होते. ते त्या नवीन पिल्लाला शक्तीसाठी व पाय सरळ करण्यासाठी औषध द्यायचे व परत यायचे आश्वासन देतात. ती त्या लाल पागोटा बांधलेल्या मुलाचे नाव विचारते, ज्याने अतिशय चपळाईने त्या उंटाच्या वासराला उभे केलेले असते. त्याचे नाव सावाराम असते. तो १२ ते १३ वर्षांचा मुलगा सावंतिबाच्या लहान भावाचा असतो. लवकरच तो मुंबईला मिठाईच्या दुकानात कामाला जाणार असतो. हे ऐकून इल्सला धक्काच बसतो. हा शांत व मोकळ्या गावातला मुलगा मुंबईच्या गर्दीत कसा राहील असे तिला वाटते. नंतर ते जेव्हा त्यांच्या गाडीशी येतात तेव्हा त्यांच्या गाडीभोवती अनेक मोठ्या शिंगांच्या गाई व म्हशी उभ्या असलेल्या दिसतात. अशा गावातल्या जनावरांच्या कळपाला चापा असे म्हणतात. ते त्या गावच्या गुराख्याची वाट बघत असतात. गावातील प्रत्येक घरांत एक गाय असते. या सर्वांना चरायला घेऊन तो जातो व संध्याकाळी परत आणतो. ही सर्व गुरे आपापल्या घरी जातात. त्याला 'गउल' म्हणतात. त्यांना या गुरांच्या आजाराविषयी पारंपरिक जास्त चांगली माहिती आहे असे देवाराम सांगतो.

तिला पहिल्यांदाच तिच्या पशुवैद्यकीय ज्ञानाकडे दुर्लक्ष केल्याबद्दल खंत वाटते. पुढच्या तीन-चार दिवसांत या दोघांच्या बरोबर ती आणखी कळपांना भेट देते. ड्रायव्हर अतिशय मदत करणारा असतो. त्याची काहीही तक्रार नसते. सकाळी सहा वाजल्या पासून ते अगदी रात्रीपर्यंत.

'समाधान' हे गरिबांना श्रीमंत बनवते! तर 'असमाधान' हे मोठ्या श्रीमंत माणसाला 'गरीब' बनवते.

सावंतिबा हा एकटाच रायका उंटांच्या आजारा-विषयी तक्रार करीत नसतो, तर इतर अनेक उंट प्रजोत्पादन करणाऱ्या रायकांच्या गर्भपात, अनेक उंटांचे मृत्यू, अपुऱ्या दिवसांचे बाळंतपण इ. समस्या असतात. राजाराम या एका प्रतिष्ठित रायकाच्या मते गर्भपात हे टीबुरसा (Trypanosomiasis) या उंटांच्या आजारांमुळे होत असणार. हा आजार मलेरिआ सारखा रक्तातील पॅरासाइटमुळे होत असणार व तो एका प्राण्यापासून दुसऱ्या प्राण्याला माशा चावून होत असणार. रायकांना या आजारावर उपाय माहीत नव्हता. ते या रोगाने पछाडलेल्या उंटाला तीन वर्षं वेगळे ठेवत असत. रायका टिबुरसा ओळखण्यात पटाईत होते. ते लघवीच्या वासावरून ओळखत.

त्यांची खास पद्धत होती. ते उंटाची लघवी व वाळू यांचे अंड्याच्या आकाराचे बॉल तयार करत. नंतर दहा मिनिटांनी वाळवून ते फोडून हुंगत. इल्स एक बॉल हुंगते तेव्हा तिला एसीटोनचा वास येतो व तिला आठवते की, पूर्वी तिच्या प्रॅक्टीस मध्ये काही गाईंना एसिटोनेमिया (acetonemia )हा आजार झाला होता. गमनाराम रायकाच्या मते उंटांना पुरेसे अन्न मिळत नसे म्हणून हे गर्भपात होत होते.

इल्सला रायका स्त्रियांविषयी अतिशय कौतुक व आश्चर्य वाटते. त्या अष्टपैलू असतात. त्या शेळ्या मेंढ्या विकण्याच्या व्यवहारांत भाग घेत. त्या खूप कष्टांची कामे करत. त्या परंपरेने आलेल्या आचार, विचाराने बांधलेल्या होत्या. त्याच्या नवऱ्यांच्या सगळ्या आज्ञा त्या हसतमुखाने झेलत. त्यांचे पेहराव, रोजचे कपडे, मोठ्ठे घेरदार लांब घागरे, नाकातील पितळ्याची मोठी सुंकले, व इतर चांदीचे दागिने या असल्या भरगच्च पेहरावांत त्या पाणी व जळणासाठी लाकूड आणत. जनावरांचे गोठे साफ करत, स्वयंपाक करत, मुलांना शाळेसाठी तयार करत, त्यांच्या नवऱ्यांसाठी रोट्या व चटणी तयार करत व कुटुंबाला आर्थिक मदत करण्यासाठी आठ तास रस्त्याची कामे करत. ती स्वत:ची त्या नारी शक्तीशी तुलना करते व ती स्वतःला फार कमी समजते. (कमी कर्तबगार)

रायका पुरुषांचे आयुष्यही कठीण असते. दिवसभर उन्हातान्हांतून ते आपल्या चरणाऱ्या उंटाच्या मागे असतात. त्यांचे दिवसभराचे खाणे म्हणजे त्याच्या खांद्यावर बांधून दिलेल्या रोट्या आणी चटणी. सूर्यास्ताला घरी आल्यावर त्याच्या कळपांतील उंटांच्या जखमा बघणे, जनावरांचे दूध काढणे व नंतर शेकोटी भोवती बसून कुटुंबाबरोबर जेवण करणे. यात कधी बदल होत नसे. ऊन, पावसाळा, हिवाळा उन्हाळा ही दिनचर्या चालू असे. अगदी आजारी पडले तरी त्यातून सुटका नसे.

उंट हे शेतांत चरत, किंवा पावसाळ्यांत त्यांना जंगलांत सोडत. अनेक उंट त्यांच्या वैयक्तिक नावाला प्रतिसाद देत असत. बहुतेक वेळेला नावे त्यांच्या शारीरिक वैशिष्ट्यांवर असत. उदा. काणी (एक डोळा असलेली) झिपरी, मेवारी इ. ते पाच वेगवेगळे आवाज काढून उंटांशी संवाद साधत. या वेगवेगळ्या आवाजांनी, त्यांना चालायला, थांबवायला, एकत्र जमा व्हायला, खायला ऑर्डर देत.

उंटपाळ त्या सगळ्यांच्या मधून सहज फिरत असे. बहुतेक उंट सौम्य व शांत असत. त्यांचे दूध काढताना ते शांतपणे उभे रहात. काही माद्या सहज दूध देत, काहींना त्यांचे बछडे समोर लागत, तर काही ठरावीक लोकांनाच दूध काढू देत. उंट सर्व साधारणपणे सौम्य व शांत असतात.

इल्स संपूर्ण परकी असूनही ती त्यांना थोपटू शकत होती. उंटांना त्यांच्या कानामागे खाजवलेलं आवडत असे.

काही दिवसांनी त्यांना मिळालेली माहिती बरीच सुसंगत होती. सरासरी रायकांच्या कुटुंबात त्यांच्या वासरा सहित दहा ते वीस मादी उंट असतात व काही वेळा एक नर उंट प्रजननासाठी असतो. तरुण उंटांना कामासाठी गाड्यांच्या मालकांना व शेतकऱ्यांना विकणे हा मुख्य उद्देश उंटांचा कळप पाळण्याचा होता. हे वर्षातून एकदा पुष्करला उंटांच्या मेळ्यांत होत असे. उंटांचे शेण हे अतिशय चांगले खत म्हणून त्याचा प्रभाव दीर्घ काळ टिकणारा असतो व त्याचे विघटन होण्यास तीन वर्षं लागत. त्याची शेतकऱ्यांना विक्री होत असे, धान्यासाठी अथवा रोख रकमेसाठी. हे सर्व व्यवहार सांभाळणे हे पूर्णपणे बायकांच्या कार्यक्षेत्रात येत असे. त्या उंटांच्या शेणाचे ढीग त्यांच्या अंगणांत ठेवत.

जर उंटांचा मुक्काम रात्री एखाद्या शेतात असेल तर रायकांना चहा, पीठ व बिड्या मिळत असत व काही वेळेस खते देण्याच्या बदल्यात रोख रक्कमही मिळत असे. चौथे उत्पादन होते केस, जे होळीच्या वेळेस एकदा कापले जात असत. पण चरण्याची सोय दिवसेंदिवस कठीण होत चालली होती व हे एक कारण होते ज्यामुळे रायकांनी उंटांचे प्रजनन करणे सोडले होते. काहींनी आपले उंट विकून टाकले होते, तर काहींनी दुसऱ्याला सांभाळायला दिले होते. वीस उंटांना चरायला द्यायचे शुल्क ३०००रु वर्षाला होते. नवजात वासरांना विकून त्यांचे पैसे मालकाला द्यायची त्यांची जबाबदारी होती.

एक दिवस पशूंच्या हॉस्पिलमध्ये बसून त्यांनी रायकांचे उंट प्रजजनांतून येणारे उत्पन्न मोजले. मुख्य उत्पन्न तरुण उंटांच्या विक्रीतून होते. समजा रायकांकडे बारा प्रजननासाठी मादी उंट असतील आणि प्रत्येक दुसऱ्या वर्षी मादी गरोदर राहत असल्या तर कुठच्याही एका वर्षी त्यांतील सहा जणींना पिल्ले होतील. त्यांतील पन्नास टक्के नर असतील तर दरवर्षी तीन तरुण उंट विकायला असतील. त्यांची किंमत हजार ते तीन हजारांमध्ये असेल. याप्रमाणे वर्षाचे उत्पन्न तीन ते नऊ हजारांमध्ये असेल. पण आपण असे धरून चाललो की, यांत कुठच्याही प्रकारचे नुकसान त्यांच्या गर्भपाताने अथवा वासराच्या मृत्यूने असणार नाही.

अर्थात थोडी जास्त मिळकत उंटांचे शेण विकून व इतर काही जणांच्या उंटांचे कळप पाळून होऊ शकते. पण इतरही खर्च होते. मुख्यतः जंगलांत चरण्यासाठी लावलेले शुल्क. हे फारसे फायद्याचे नाही. ईल्स म्हणते, तिला उंट आवडतात पण, आर्थिक दृष्टिकोनातून याला काही अर्थ रहात नाही व ते इतर काही कामाकडे का वळत नाहीत? मुद्दामून थोडी प्रक्षोभक होऊन विचारते.

विनय व डॉ. देवाराम दोघांनाही धक्का बसतो व ते सांगतात की, तिने हे समजून घ्यायला हवे की, उंटांचे प्रजनन करणे ही त्यांची परंपरा आहे.

डॉ. देवाराम त्याच्या म्हणण्याला दुजोरा देतो की, हे रायकांचे कर्तव्य आहे. ते, ते एकदम सोडू शकत नाहीत. मग विनय तिला रायकांच्या मुळाविषयी गोष्ट माहीत नाही का ? असं विचारतो व सर्व गोष्ट परत सांगतो. पहिला रायका सुमार हा शिवाने (शंकराने) पहिल्या उंटाची काळजी घेण्यासाठी तयार केला. शिवा ध्यान करत होता.. देवी पार्वती कंटाळली. वेळ घालवण्यासाठी ती मातीचे प्राणी बनवत होती. तिने एक पाच पाय असलेला विचित्र प्राणी बनवला व शिवाला त्याच्यात जीव घालायला सांगितला. शिवाने प्रथम नकार दिला. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, पाच पायाच्या जनावराला खूप अडचणी येतील. पण पार्वतीने खूप विनवण्या केल्या. शिवाने त्याच्यात जीव घातला व म्हणाला, 'उठ', तो प्राणी उठला, पण त्याला खूप अडचणी होत्या. म्हणून शिवाने त्याचा पाय दुमडून

---

जर तुम्ही त्या व्यक्तीचा शोध घेत असाल की ज्याने तुमचे आयुष्य बदलले असेल;
तर तुम्ही आरशात पाहा!..

पाठीवर ठेवला. ते कुबड तयार झाले. मग पार्वतीने त्याची काळजी घ्यायला एक माणूस तयार करायला सांगितला. नंदीने त्याच्या घामापासून, धूळी पासून पहिला रायका तयार केला. विनय तिच्याकडे थोडा कठोर दष्टीने बघून सांगतो की, त्यांचे धार्मिक कायदे कानून त्यांना दूध विकण्यास मनाई करते. विनय तिला सांगतो की, तिने डॉ. देवाराम कडून ऐकले असेल की, त्यांच्यामध्ये एक प्रसिद्ध म्हण आहे. 'दूध विकले, मुलगा विकला' म्हणजेच दुधाची विक्रीही मुलांना विकण्या बरोबर समजली जाते. जास्तीचे दूध विकण्याऐवजी फुकट वाटले पाहिजे असे मानतात. ही वर्ज्य समजलेली गोष्ट ज्यांनी केली त्यांच्याविषयी अनेक कहाण्या सांगितल्या गेल्या. एकतर पूर्ण उंटांचा कळप मेला किंवा त्या कुटुंबातील सदस्य अचानकपणे दगावले.

विनय तिला पुढे म्हणाला की, तू बिकानेरमध्ये बरोबर निरीक्षण केले आहेस की, उंटाच्या दुधावर प्रक्रिया केली जात नाही. उंटाचे दूध नेहमी ताजे प्यायले जाते. बाकीच्या जनावरांच्या दुधासारखे आधी न तापवता. पण ते चहासाठी व खीर करायला वापरता येते.

इल्सला ही गोष्ट आकर्षक जरूर वाटते. पण तिला हे अविश्वसनीय वाटते. पैशांच्या जोरावर चालणाऱ्या या जगांत फक्त कोणी कर्तव्यापोटी व धार्मिक किंवा अधार्मिक म्हणून गोष्टी करेल का? तिला हा विचार पटला नाही. ती त्याबद्दल साशंक असते. रायका उंटांचा उपयोग ठरावीक पद्धतीने करतात त्याला काही ऐतिहासिक किंवा पर्यावरणीय कारणे असावीत. कदाचित त्यांनी हिंदू गाई संबंधीचा पूज्यभाव त्यांच्या जवळच्या जनावरामध्ये पाहिला असणार. तिने विचार केला की, भारतातील मुसलमानाचे उंटांशी कसे संबंध असतील हे जाणणे गरजेचे आहे. त्यांच्या उंटाविषयी रायकां सारख्याच भावना होत्या, की जास्त संधीसाधू भावना होत्या व ते उंटापासून शक्य असणाऱ्या सर्व उत्पादनांचा अरबांसारखा उपयोग करत? तिला असे वाटते की, उंटाच्या दुधावर प्रक्रिया करण्याविषयी असलेली बंदी किंवा मनाईला सुद्धा काहीतरी तर्कशुद्ध कारण असू शकते. उंटाचे दूध दही, चीज किंवा लोणी बनवणे फार कठीण आहे. प्रथिनांच्या संरचनेशी त्याचा काहीतरी संबंध होता, असे तिला अस्पष्टपणे आठवते.

तरीही, पुढच्या काही दिवसांत तिने रायकांच्या वृत्ती आणि भावनांकडे जास्त लक्ष ठेवले. आतापर्यंत तिची आवड अधिक तांत्रिक बाबींवर, कळपाची रचना, व्यवस्थापन आणि त्याचा उपयोगाची पद्धत यावर होती, आता तिने कान उघडे ठेवले.

दुसऱ्या दिवशी सकाळी एक लांब पांढरी दाढी असलेल्या हरजीराम नावाच्या रायकाने आणखी काही सूचना दिल्या. सर्व गोद्वार मध्ये एका अतिशय चांगल्या स्थावर मालमत्ता असलेल्या जागेवर त्याची झोपडी एका खडकाच्या माथ्यावर होती, जिथून दक्षिणेकडे पसरलेली आरवलीची रांग, तसेच उत्तरेला मारवाडच्या मैदानाचे भव्य दृश्य होते. त्याची पत्नी मरण पावली होती, त्याच्या चार मुलींची लग्ने झाली होती. एकुलता एक मुलगा मुंबईत कामाला होता. वयाने आणि अफूच्या व्यसनामुळे तो अपंग असला तरी हरजीराम आपल्या उंटांची काळजी घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत होता. तो एक दयाळू यजमान होता आणि त्याच्या भावाची बायको झोपडीत चहा बनवत असताना, त्याने त्याच्या धोतराच्या ओच्यातून एक लहान आणि सुरकुतलेली प्लास्टिकची पिशवी काढली आणि काही चिकट मटारच्या आकाराचे तुकडे काढले व त्यांना देऊ केले. ही अफू आहे हे डॉ. देवराम यांनी स्पष्ट केले. ती देणे हा रायकांच्या आदरातिथ्याचा, संस्काराचा एक भाग आहे. थोडीशी घेतल्याने काहीही नुकसान होणार नाही, त्यांनी प्रोत्साहित केले आणि नंतर नमस्ते करण्यासाठी हात जोडून अफू खाण्याचा योग्य शिष्टाचार दाखवला,

देवीला नमस्कार करून आई माताजी, डोके मागे झुकवून, डावा हात डब्यात ठेवून, आणि नंतर जिभेच्या मागील बाजूस तुकडा ठेवला व गिळला.

चारपाईवर बसून त्यांनी आजूबाजूच्या देखाव्याचा आनंद घेतला आणि ते चरण्याच्या समस्या, दुष्काळ आणि रोगांबद्दल बोलले. हजिरामला असेही वाटले की, अलीकडच्या वर्षांत रोगांचे प्रमाण वाढले आहे आणि त्याचे कारण देवता क्रोधित होऊन समाजाला शिक्षा देत आहेत. राईकाचा समाजावर राग आहे कारण ते मादी जनावरे विकत आहेत. पूर्वी, ते असे कधीच करत नव्हते. परंतु आता मादी मेंढ्या विकण्याचा सराव केला जात आहे आणि आता मादी उंटही बाहेरच्या समाजांतील लोकांनाही विकले जात आहेत. हे त्यांना कुठे घेऊन जाईल? त्यांच्या मादी प्राण्यांनी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जायला हवे. देव आम्हाला रोग आणि दुष्काळ पाठवून शिक्षा करत आहे. तो चिडून पुढे म्हणाला. माझा मुलगा, घिसूलाल, मुंबईत काम करतो; दगड –कापायचे. तो पैसे कमावतो आणि काही त्याला पाठवतो. पण आता मी या उंटांचे काय करणार? मी आता म्हातारा व दुर्बल झालो आहे व प्रत्येक दिवस जीवन कठीण होत चालले आहे.

त्याचे हे नैराशाजनक विचार त्याच्या भाभीने पितळ्याच्या किटलीतून आणलेल्या चहा व तीन कप बशामुळे मध्येच थांबतात.

नंतर तो इल्सला सांगतो की, त्याचे काही उंट मॅनगेने आजारी असतात. तो इल्सला त्यांच्याकडे बघायला सांगतो व काय करता येईल विचारतो. हाजीरामच्या आठ माद्या उंट अतिशय वाईट अवस्थेत असतात...

काहीजणांच्या अंगावर खाजवल्यामुळे थोडेफारही केस शिल्लक नव्हते. डॉ. देवारामने काळजीने त्याचे डोके हलवले. तो म्हणाला, हे अतिशय वाईट आहे व पूर्ण कळपाला याची लागण, तरुण उंटासकट होऊ शकते. त्या उंटांवर लगेचच उपाय करायची गरज असते. त्यांचे पूर्ण शरीर कीटकनाशकाने चोळायला हवे किंवा वापरलेल्या इंजीनाइलने. पण हे खूप जास्तीचे काम असते. एकटा हाजीराम ते करू शकला नसता.

थोड्या दिवसांच्या अवधीत तिला दोनदा तिचे पशुवैद्यकीय ज्ञान विसरल्या बद्दल पश्चात्ताप होतो. पण सुदैवाने डॉ. देवारामला मॅनगेच्या औषधव्यवस्थे विषयी सर्वकाही माहीत असते. त्वचेचा रोग (बाधा) जो लहान किड्यांनी होतो व ते त्वचेत घुसतात. हा टीबुरसा खेरीज उंटाना होणारा मोठा रोग आहे. यासाठी अनेक उपाय आहेत. पूर्वापार वापरात असलेली व स्थानिक पातळीवर बनवलेली तेल, किंवा व्यावसायिक रीतीने बनवलेली कीटकनाशके. त्या सर्वांमध्ये पूर्ण उंटाला बुडवून किंवा ते उंटाच्या अंगाला जोरात चोळण्याची गरज असते. उंटाच्या शरीराचा पृष्ठभाग खूप मोठा असतो.

शेवटी, जरी ती उंटांना बघण्याने, त्यांच्या संबंधी माहिती मिळविण्याने व रायकांशी संबंध जोडण्याने ती उत्तेजित व आनंदी झाली होती तरी तिला असे वाटते की, वैद्यकीयदृष्ट्या अलिप्त राहून संशोधन शक्य नाही. उंट वन्यजीव नाहीत की ज्यांचे ती दूरवर आणि तटस्थपणे निरीक्षण करू शकते, आणि ज्यांच्यापासून तिची संशोधनाची उद्दिष्टे पूर्ण झाल्यानंतर ती स्वतःला त्यांच्या पासून वेगळे करू शकेल. ते त्यांच्या धन्याबरोबर आले आणि तिने प्रश्न विचारायला सुरवात केल्यावर त्यांच्याशी एक नाते निर्माण झाले. नात्याशिवाय, कोणीही तुम्हाला फारशी माहिती सांगणार नाही.

जोपर्यंत लोकांना वाटत नाही की तुम्ही निष्ठावान समर्पित आहात व तुम्ही त्यांच्या उंटाविषयी व त्याच्या विषयी आस्था व काळजी बाळगता, तोपर्यंत ते तुम्हांला

---

आज कोणीतरी सावलीत बसले आहे, कारण कोणीतरी खूप दिवसांपूर्वी एक झाड लावले होते!

माहिती देणार नाहीत. हा धडा ती बिकानेर येथे शिकली. गोदवार येथे लोक बोलते झाले कारण डॉ. देवराम त्यांच्या समुदायातील होता आणि त्याने लोकांच्या समस्यामध्ये रस घेतला होता. त्यामुळे त्याच्या पशुवैद्यकीय ज्ञानाला खूप मागणी होती.

एकत्र बसल्याशिवाय संशोधन शक्य नव्हते, चहाचे भरपूर कप प्यायले नाहीत, पाहुणचार स्वीकारले नाहीत तर लोकांच्या मनात काय आहे हे सांगण्याचा पुरेसा आत्मविश्वास निर्माण होत नाही. विशेषत: चहा घेणे एक प्रकारची कसोटी किंवा परीक्षा होती. (Acid test) हे सिद्ध करण्यासाठी की तुम्ही फक्त स्वतःच्या फायद्यासाठी माहिती गोळा करण्यासाठी तिथे आला नव्हता व तुम्ही लोकांना व त्यांच्या स्वत:च्या अधिकारांना महत्त्व देता. आणि स्थानिक प्रमाणाप्रमाणे (नियमाप्रमाणे) त्यांच्याशी जोडलेले आहात.

नातेसंबंध आणि ज्ञानामुळे जबाबदारी आली. त्यावेळेस तिला खात्री नव्हती की, त्यानंतर कुठला पेचप्रसंग येईल याची तिला जाणीव नव्हती. कारण तिच्यावर इतरही जबाबदाऱ्या होत्या: तिचे कुटुंब गॅरी, जोन आणि आयशा राजस्थानला भेटायला येत होते.

**– सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पीटल
ठाणे
भ्रमणध्वनी – ९८३३०२९३५६

•••

***दिशा संपर्क दूरध्वनी***
***०२२-२५४२ ६२७०***

(मुखपृष्ठ क्र.२ वरून – **संपादकीय**)

असा आला की, दोन दिवसांत ती मोठी पेटी प्रश्नांनी भरली. त्यात एकूण ४००० प्रश्न होते!

मुंबई जवळील विरार गावातील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत व्याख्यान देण्याचे निमंत्रण मला मिळाले. तिथल्या मुख्याध्यापकाशी चर्चा करीत असता विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू वृत्तीवर आमचे बोलणे सुरू झाले. विद्यार्थी फारसे जिज्ञासू नसतात असे त्यांचे मत होते. माझे मत मात्र याच्या विरुद्ध होते. विद्यार्थी जात्याच जिज्ञासू असतात आणि संधी मिळाली की ते आपल्या मनात असलेले प्रश्न विचारतात असा माझा ठाम विश्वास आहे. वर्गात विद्यार्थ्यांना प्रश्न विचारायला संधीच मिळत नाही म्हणून ते गप्प बसतात. त्याऐवजी शाळेच्या प्रवेश द्वाराजवळ जर एक प्रश्न पेटी ठेवली तर मुले त्यांच्या मनात आलेले प्रश्न कागदावर लिहून पेटीत टाकतील. माझी सूचना स्वीकारून मुख्याध्यापकांनी प्रश्न पेटी ठेवण्याचे मान्य केले. या कृतीला चांगला प्रतिसाद मिळाला. आलेल्या प्रश्नांची सकाळी प्रार्थनेच्या वेळी उत्तरे देण्याचा शिरस्ता त्यांनी सुरू केला. शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस त्यांनी माझ्याकडे मुलांनी विचारलेल्या २००० प्रश्नांची यादी पाठविली.

वरील सर्व अनुभवातून एक बाब स्पष्ट होते ती म्हणजे विद्यार्थ्यांची अतृप्त जिज्ञासा. त्यासाठी शिक्षणसंस्था आणि सामाजिक संस्था यांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे असे मला वाटते. हे जर झाले नाही तर विद्यार्थ्यांची जिज्ञासू वृत्ती मारली जाईल आणि ते विज्ञानाच्या प्रगतीला मारक ठरेल.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

आपण एकटे असलो तरी हरकत नाही. आपल्यामागे कुणी येवो ना येवो.
जे आपल्याला करावेसे वाटते ते करण्यातच आपल्या जीवनाची सार्थकता आहे.

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- दि.२५ ऑगस्ट रोजी Rotract Club ठाणे तर्फे 'हुन्नर'या शीर्षकाखाली झालेल्या हस्तकला स्पर्धेत कु. आराध्या पाटील (इ. ६वी) या विद्यार्थिनीस तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

- दि.५ सप्टेंबर रोजी वाजत गाजत लेझीमच्या तालावर आपल्या सर्वांच्या प्रिय गणरायांचे आगमन झाले. स्त्री कल्याण संघटनेतर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत

  १)विनया निलेश खामकर (इ. ५वी)

  २)देविका ज्ञानेश्वर सिनलकर (इ. ७वी) या दोन विद्यार्थिनींना द्वितीय क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले.

- दि. २१ सप्टेंबर रोजी भारत विकास परिषद, ठाणे तर्फे या वर्षी सौ. नेत्रा श्रीकांत सोनवणे यांना 'गुणवंत शिक्षक' म्हणून पुरस्कार प्राप्त झाला. तर कु. साई हजारे (१०वी) आणि कु. प्राची चव्हाण (१०वी) या दोन्ही विद्यार्थ्यांना 'गुणवंत विद्यार्थी' पुरस्कार ट्रॉफी तसेच प्रमाणपत्रसह प्राप्त झाला.



भारत विकास परिषदेमार्फत 'भारत को जानो' या प्रश्नमंजुषा स्पर्धेत लहान गटातील

१) कु. अनय पोतनीस (इ. ६वी)

२) कु. गौरांग चव्हाण (इ. ६वी)

या विद्यार्थ्यांना तिसरा क्रमांक प्राप्त झाल्याबद्दल मेडल सहित प्रमाणपत्र प्राप्त झाले. तसेच मोठ्या गटातील

१) कु. श्रावणी जाधव (१०वी)

२) कु. आर्या जगताप (१०वी) या दोघींनाही सहभाग प्रमाणपत्र प्राप्त झाले.



- दि.२१ सप्टेंबर रोजी मोहन शेलवले यांना ब्राह्मण सेवा संघातर्फे 'आदर्श शिक्षक' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.



- सोमवार दि. २३ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. इ.९वी व १०वी च्या विद्यार्थ्यांनी इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम केले. वर्ग शिक्षक व विषय शिक्षकांनी त्यांना योग्य मार्गदर्शन केले. विद्यार्थी शिक्षकांना विषय वाटप करणे, वेळापत्रक आखणे, तसेच शिपाई वर्गापासून मुख्याध्यापक पदापर्यंतचे संपूर्ण नियोजन उत्तमरित्या करण्यात आले. अध्यापनानंतर झालेल्या एकत्रित सभेत शिक्षक बनलेल्या विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व, आपल्याला आलेले अनुभव व गंमती जंमती सर्वांसमोर मांडल्यात. अशा प्रकारे अतिशय उत्साहात व आनंदात शिक्षक दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला.



▪ दि. २४ सप्टेंबर रोजी आद्य क्रांतिवीर प्रकाशन, ठाणे यांच्या वतीने स्व. चित्रा वसंत पुराणिक यांचे स्मरणार्थ इ.८ वी साठी 'स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर' या विषयावर श्री. मनोज मसुरकर यांचे व्याख्यान आयोजित केले होते. या प्रसंगी श्री. प्रफुल्ल पुराणिक, श्री. हेमंत आळवे उपस्थित होते.



▪ दि. १ ऑक्टोबर रोजी इयत्ता ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांना 'जिंकी रे जिंकी' हा चित्रपट दाखवण्यात आला.

▪ पर्यावरण दक्षता मंडळातर्फे 'निसर्ग मेळावा-कारवी महोत्सव' निमित्त दिनांक २ ऑक्टोबर रोजी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात कु. सिया पवार (इ. ७वी) या विद्यार्थिनीस चित्रकला स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षीस आणि सहभाग प्रमाणपत्र मिळाले.

▪ सुरवाणी ज्ञान मंदिर केंद्रातर्फे दि.२ऑक्टोबर रोजी इ.५वी ते ७वी साठी आयोजित 'प्रज्ञाविवर्धन स्तोत्र' पठण स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत इ.५ वी ते ७वी मधून एकूण १३ विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तर विजयी विद्यार्थ्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र बक्षीस रूपाने देण्यात आले.

प्रथम क्रमांक - कु.आदित्य खोत (७वी)
द्वितीय क्रमांक - कु.गौरांग रिसबूड (७वी)
तृतीय क्रमांक - कु.आदेश खंडागळे (५वी)
कु.विराज हंबीरकर (७वी)
उत्तेजनार्थ - कु.त्रिशा शेलार

तसेच इ. ८वी ते १०वी साठी 'सूर्याष्टकम स्तोत्र' पठणस्पर्धेत दीपिका खंडागळे हिस द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

▪ पर्यावरण दक्षता मंडळातर्फे दि. ६ ऑक्टोबर रोजी मानपाडा येथे घेण्यात आलेल्या कापडी पिशवी वरील चित्रकला स्पर्धेत सोनाली जड्यार (७वी) या विद्यार्थिनीला उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले.




▪ दि.७ ऑक्टोबर रोजी शारदीय नवरात्रोत्सव निमित्त शाळेत इ. ५वी ते ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी आरती स्पर्धा आणि इ. ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी पाककला स्पर्धा घेण्यात आल्या.



ठाणे जिल्हा आर्चरी स्पर्धेत कु. पार्थ भोसले (१०वी) या विद्यार्थ्यास सर्वप्रथम क्रमांक प्राप्त झाला. आणि पुढील विभागीय पातळीसाठी निवड झाली.

▪ दि. ३० ऑक्टोबर रोजी रोटरॅक्ट क्लब ऑफ ठाणे, हिल्स यांच्यातर्फे श्री.अभय शेंडे, श्री.हर्षद दिवेकर,

सौ. राधिका पदमनभम यांनी इ.१० वी च्या विद्यार्थ्यांना 'आयडियल स्टडी ॲप' ची ओळख करून दिली व अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन केले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**९ ऑगस्ट २०२४ – नागपंचमी**

श्रावण महिन्यात येणारा पहिला सण म्हणजे नागपंचमी, शिक्षकांनी चिकण मातीचा मोठा नाग व शेत अशी प्रतिकृती केली होती. नागाला शेतकऱ्याचा मित्र का म्हणतात याची माहिती मुलांना देण्यात आली. नागाची पूजा करून मुलांनी त्याचा श्लोक व गाणे म्हटले. चणे आणि साखर फुटाणे असा प्रसाद मुलांना देण्यात आला.

ज्यूनियर – स्टेनसिलवर बोटाचे ठसे काम केले व हिरव्या खडूने गवत काढणे.

सिनीयर – कागदाचे साप बनवणे.

**१४ ऑगस्ट २०२४ – स्वातंत्र्य दिन**

भारताचा स्वातंत्र्य दिवस १४ ऑगस्ट रोजी शाळेत साजरा करण्यात आला. नर्सरी व ज्यूनियरच्या मुलांनी झेंड्याचे रंग असलेले कपडे परिधान केले होते. शिक्षकांनी स्वातंत्र्य दिनाची माहिती दिली. राष्ट्रगीताचा व राष्ट्रध्वजाचा आदर करण्यास सांगितले. काही स्वातंत्र्य सैनिकांची ओळखही करून देण्यात आली. सिनीयरच्या मुलांनी स्वातंत्र सैनिकांची वेशभूषा परिधान केली होती व त्याबद्दल २३ वाक्यात माहिती दिली.

नर्सरी – झेंड्याच्या स्टेनसिलवर स्पंजने ठसेकाम करणे.

ज्यूनियर के. जी. – चित्रकला वहीत झेंडा रंगवणे.

सिनीयर के. जी. – झेंड्याच्या रंगांने चित्र रंगवणे.

**१६ ऑगस्ट २०२४ – रक्षाबंधन**

१६ ऑगस्ट रक्षाबंधन सण उत्साहात साजरा झाला मुलांनी नवीन कपडे घातले होते. कोळी बांधवांचा महत्त्वाचा सण नारळी पौर्णिमा व भाऊ बहिणींचा प्रेमळ बंधनाचा सण म्हणजे रक्षाबंधन या सणांची माहिती मुलांना चित्राद्वारे (AV lessons) देण्यात आली.

ज्यूनियर आणि नर्सरी मुलांसाठी सोनेरी दोरा व मणी यांच्या सहाय्याने ज्यूनियरच्या मुलांनी राख्या तयार केल्या, सिनीयरच्या मुलांनी पालकांच्या मदतीने घरात उपलब्ध असलेला साहित्यातून राख्या तयार केल्या. नारळाची वडी मुलांना खाऊ म्हणून देण्यात आला.

**२६ ऑगस्ट २०२४ – गोकुळाष्टमी, दहिहंडी**

सर्व मुलांनी कृष्णाचा वेश परिधान केला होता व मुलींनी राधेचा वेश परिधान केला होता. कृष्णजन्माची व दहिहंडीची गोष्ट मुलांना दाखवण्यात आली. मुलांनी कृष्णाची पूजा केली. कृष्णाची गाणी व श्लोक म्हटले. व्हरांड कृष्णाची विविध चित्रे लावून सुशोभित करण्यात आला होता. नर्सरी व ज्यूनियरच्या मुलांनी 'गोविंदा रे गोपाळा' म्हणत दहिहंडीची मजा लुटली, यावेळी हंडी उपडी करण्यात आली. सिनीयरच्या मुलांनी गाण्यावर नृत्य केले व हंडी फोडली. काल्याचा प्रसाद मुलांनी आवडीने खाल्ला.

नर्सरी – हंडीच्या चित्रावर फुलाच्या स्टॅम्पने ठसेकाम करणे.

ज्यूनियर के. जी. – हंडीचे चित्र रंगवून त्यावर कापूस चिकटवणे.

सिनीयर के. जी. – कृष्णाचे चित्र रंगवणे.

**५ सप्टेंबर २०२४ – गणेशोत्सव**

मुलांचा लाडका गणपती बाप्पा. ५ सप्टेंबरला गणेशोत्सव शाळेत साजरा झाला. पारंपरिक वेशभूषेतील

आमची बाळगोपाळ मंडळी बाप्पाच्या आगमनाची वाट पहात होती. शाडूच्या मातीची मूर्ती आणून सजावटीतही पर्यावरणपूरक गोष्टींचा वापर करण्याविषयीची माहिती शिक्षकांनी काही दिवसांपूर्वीच दिली होती.

५ सप्टेंबरला गणपतीची गोष्ट, शिक्षक दिनाची माहिती मुलांना देण्यात आली. मुलांनी झांजाच्या व बाप्पाच्या जयघोषात गणपती बाप्पाची मूर्ती आणली. गणपतीची पूजा व आरती करण्यात आली. मुलांनी गणपतीची गाणी व श्लोक म्हटले.

सिनीयरच्या मुलांनी गणपतीचे विर्सजन केले. लेझीमच्या व गणपती बाप्पाच्या गजरात विसर्जन मिरवणूक निघाली. पर्यावरणपूरक विर्सजन कसे करायचे याबद्दल मुलांना माहिती दिली. तळलेल्या मोदकाचा प्रसाद मुलांना दिला गेला.

नर्सरी – मोदकाचे चित्र रंगवणे.

ज्यूनियर के. जी. – ठसेकाम करून गणपतीच्या चित्राची आरास पूर्ण करणे.

सिनीयर के. जी. – चिकणमातीचा गणपती तयार करणे. चित्रकलेच्या वहीत गणपतीचे चित्र काढणे.

**१४ सप्टेंबर २०२४ – हिंदी भाषा दिवस**

ज्यूनियरच्या मुलांना नुकतीच हिंदी भाषेतील स्वरांचा परिचय करून देण्यास सुरवात झाली. १४ सप्टेंबरला हिंदी आपली राष्ट्रभाषा आहे व त्याची माहिती दिली. हिंदीतील एक-दोन गाणी घेतली गेली व हिंदी विषयासाठीची प्रथम कार्यपत्रिका (Worksheet) मुलांना देण्यात आली.

**चांगला व वाईट स्पर्श (Good / Bad Touch)**

सार्वजनिक ठिकाणी वावरताना स्वत:ची काळजी कशी घ्यायची? चांगले वाईट स्पर्श म्हणजे काय? ते कसे ओळखायचे? याबद्दल पालकांना शिक्षकांना सांगायचे. या संबंधीची माहिती मुलांना शिक्षकांनी दिली.

**३ ऑगस्ट व २१ सप्टेंबर – पालक सभा**

दर महिन्याला नियमितपणे पालक सभा घेतल्या जातात. पाल्यांची प्रगती, पालकांच्या सूचना याची चर्चा होते.

शाळेत होणाऱ्या सर्व उपक्रमांची माहिती पालकांना facebook, instagram सारख्या माध्यमांतून वेळोवेळी दिली जाते.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक विभाग

सौ. लिना डॉमिनिक यांना ब्राह्मण सेवा संघ, ठाणे यांच्यातर्फे आदर्श शिक्षक या पुरस्काराने गौरवण्यात आले.




रोटरी क्लब ठाणे यांच्यातर्फे आयजित 'कूल गुरू' या स्पर्धेत आपल्या शाळेतील अनेक शिक्षकांनी सहभाग दर्शविला. त्यांनी शिक्षकांसाठी अनेक स्पर्धेचे आयोजन केले होते. कुमारी जान्हवी जोशी, सौ. लक्ष्मी डिसूजा, व सौ. वरदा देशपांडे यांनी या स्पर्धेत वक्तृत्व स्पर्धा व नृत्यस्पर्धेत बक्षिसे पटकावली.



## जोशी–बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

महाविद्यालयातील कु. नेत्रा कापडणे, कु. सानवी मुकादम आणि कु. सृष्टी कांबळे या विद्यार्थिनीना ठाणे झोन मधील मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या अंतर महाविद्यालयीन महिला विशेष क्रीडा स्पर्धेत बॅडमिंटन या क्रीडा प्रकारात प्रथम पारितोषिकासह सुवर्ण पदक प्राप्त झाले.

दिनांक ५ सप्टेंबर रोजी इंगजी विभागातर्फे शिक्षक दिन तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी साजरा केला. याप्रसंगी उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर प्रमुख अतिथी होत्या.

दिनांक १४ सप्टेंबर रोजी विवेकानंद अभ्यास मंडळाने वैश्विक बंधुभाव दिवस साजरा केला. याप्रसंगी उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर प्रमुख अतिथी होत्या.

दिनांक १४ सप्टेंबर रोजी हिंदी विभागाने वैश्विक परिदृश्य में हिंदी कार्यक्रम साजरा केला. याप्रसंगी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक अध्यक्षा आणि डॉ. ऋषिकेश मिश्र, प्राध्यापक विदेशी अध्ययन केंद्र, टोक्यो विश्वविद्यालय हे प्रमुख अतिथी होते.

दिनांक १७ सप्टेंबर रोजी हिंदी विभाग आणि बिरला महाविद्यालय कल्याण यांच्या समन्वयाने 'समकालीन हिंदी कविता का उत्सव' या कार्यक्रमाच्या अंतर्गत 'कॅम्पस में कविता' हा काव्य सादरीकरणाचा कार्यक्रम घेण्यात्त आला. यात श्री. मिथिलेश श्रीवास्तव, श्री. सुनील मिश्र, डॉ. रिता दास राम, डॉ. हूबनाथ पाण्डेय आदी मान्यवर कवी उपस्थित होते. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक अध्यक्षा होत्या. डॉ. अनिल ढवळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

दिनांक २० सप्टेंबर रोजी हिंदी विभागातर्फे हिंदी पंधरवडा साजरा करण्यात आला. त्या औचित्याने 'स्वरचित काव्य पाठ प्रतीयोगीते'चे आयोजन करण्यात आले होते. विजेते विद्यार्थी – प्रथम क्रमांक प्राची गुप्ता द्वितीय क्रमांक – महबूब समानी, तृतीय क्रमांक भूमिका तिवारी या विद्यार्थ्यांना प्राप्त झाले प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक अध्यक्षा होत्या. डॉ. अनिल ढवळे यांनी कार्यक्रमाचे निर्णायक पद सांभाळले.

दिनांक २१ सप्टेंबर रोजी हिंदी विभागातर्फे हिंदी पंधरवडा साजरा करण्यात आला त्या औचित्याने भाषण प्रतीयोगीतेचे आयोजन करण्यात आले होते. विजेते विद्यार्थी – प्रथम क्रमांक श्रद्धा वरक, द्वितीय क्रमांक निशंक दुबे, तृतीय क्रमांक – खातारी खातून अन्सारी या विद्यार्थ्यांना प्राप्त झाले. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक अध्यक्षा होत्या. डॉ. अनिल ढवळे यांनी कार्यक्रमाचे निर्णायक पद सांभाळले.

दिनांक २३ सप्टेंबर रोजी संस्कृत विभागातर्फे संस्कृत दिवस – श्रावणमोद या संकल्पनेने साजरा करण्यात आला त्या औचित्याने नाटक, गाणी, नृत्य आदी संकृत कार्यक्रम सादर करण्यात आले होते. डॉ. नम्रता जगताप, संस्कृत विभाग रुईया महाविद्यालय या प्रमुख अतिथी होत्या.

दिनांक २७ सप्टेंबर रोजी एम. कॉम विभागातर्फे विश्व पर्यटन दिवस साजरा करण्यात आला.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

### बांदोडकर सायबर वॉरियर्सनी कॉलेज कॅम्पसमध्ये सायबर क्राईम जनजागृती रॅलीचे नेतृत्व

बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी मागील वर्षापासून क्विक हिल संस्थेशी निगडित सायबर सुरक्षा अभियान अंतर्गत सायबर वॉरियर्स म्हणून कार्यरत आहेत. सायबर क्राईमच्या वाढत्या धोक्याला आटोक्यात आणण्याच्या प्रयत्नात, बांदोडकर सायबर वॉरियर्सच्या नेतृत्वाखालील सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या

सक्रीय व्हा, जिम्मेदारी घ्या, त्या गोष्टींवर काम करा ज्या वर तुम्हाला विश्वास आहे.
जर असे तुम्ही करत नसाल तर तुम्ही तुमचे भाग्य दुसऱ्याच्या हवाली (समर्पित) करत आहात!

व दुसऱ्या आठवड्यात ठाणे कॉलेज कॅम्पसमध्ये सायबर क्राईम जनजागृती रॅलीचे आयोजन केले होते.

बांदोडकर सायबर वॉरियर्सने रॅलींद्वारे, २००० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांचे विविध स्वरूप आणि डिजिटल जगात स्वतःचे संरक्षण कसे करावे याबद्दल यशस्वीरित्या मार्गदर्शन केले आणि त्यांना शिक्षित केले. या वॉरियर्सनी संपूर्ण ठाण्यातील शाळा आणि महाविद्यालयांना भेट देऊन फिशिंग, आयडेंटिटी थेफ्ट, सायबर बुलिंग आणि डेटा गोपनीयतेचे उल्लंघन यासह ऑनलाईन धोक्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठीची ही मोहीम व्यापकपणे पोहोचण्याच्या प्रयत्नांचा एक भाग होती.

शिक्षक समन्वयक तेजस जाधव यांच्या नेतृत्वाखाली, सायबर क्लबच्या अध्यक्षा नंदिनी त्यागी, क्लबच्या सचिव श्रुती शिरसाठ, संचालिका रोशनी वनारे आणि अरहंत शिर्के यांचा प्रामुख्याने समावेश होता. यांनी मिळून सायबर सुरक्षेचा संदेश विविध शैक्षणिक संस्थांमधून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला.

विद्यार्थ्यांना त्यांची डिजिटल ओळख सुरक्षित करण्यासाठी आणि सामान्य ऑनलाईन अडचणी टाळण्याबाबत टीप्स देखील देण्यात आल्या.




**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यशाळा संपन्न**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मुंबई विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षापासून राबविण्यास सुरुवात झाली आहे. याकरताच सर्व महाविद्यालयातील शिक्षक वर्गाला उद्बोधित करण्याकरिता मुंबई विद्यापीठातर्फे "Workshop for Subject Teachers for Orienting Towards NEP 2020 Compliant Syllabus and Curriculum" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, स्वायत्त ठाणे या महाविद्यालयांमध्ये यशस्वीरित्या आयोजित करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी दहा वाजता डॉ. हिरेन दंड विभागप्रमुख, माहिती तंत्रज्ञान विभाग, मुलुंड कॉमर्स ऑफ कॉमर्स आणि डॉ. वसंत माळी, प्राचार्य वाटुमल साधूबेला महाविद्यालय, उल्हासनगर यांच्या हस्ते संपन्न झाले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. विंदा मांजरमकर यांनी कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. हिरेन दंड यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मधील मेजर मायनर क्षमता विकास अभ्यासक्रम इत्यादी बाबत मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात डॉ. वसंत माळी यांनी भारतीय ज्ञान व्यवस्था (आई के एस) परीक्षा व मूल्यांकन पद्धती याबद्दल चर्चा घडवणे, त्यानंतर सर्व उपस्थित शिक्षकांच्या शंकांचे निरसन देखील त्यांनी केले.

त्यानंतर दुपारच्या सत्रामध्ये भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, गणित, जैवतंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, संगणक शास्त्र, डाटा सायन्स या नऊ विषयांवर अभ्यास मंडळातर्फे सखोल

चर्चा करण्यात आली. प्रत्येक अभ्यास मंडळाच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांनी उपस्थित विषय शिक्षकांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत होऊ घातलेल्या विषयांच्या बदलांच्या बाबतीतील मार्गदर्शन केले व त्यांच्या शंकांचे निरसन केले.

या कार्यशाळेचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापिका सायली दप्तरदार व पूर्वी शाह यांनी केले. तर डॉ. कल्पिता मुळे यांनी आभार प्रदर्शन केले या कार्यशाळेला २५० शिक्षक सहभागी झाले होते.





**ग्रंथालय विभाग**

ग्रंथालय विभागातर्फे विविध थोर व्यक्तींच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त माहिती प्रदर्शन भरविण्यात आले होते.

५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच त्यांच्या कार्याबद्दल माहिती प्रदर्शित करण्यात आली. हिंदी भाषा दिवसा निमित्त १४ सप्टेंबर २०२४ रोजी पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते. २५ सप्टेंबर २०२४ रोजी पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला, तसेच त्यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन ग्रंथालयात भरविण्यात आले होते. २७ सप्टेंबर २०२४ रोजी भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस आर रंगनाथन यांच्या व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच यांच्यावरील माहितीचे व पुस्तक प्रदर्शन ग्रंथालयात भरविण्यात आले होते.


५ सप्टेंबर २०२४



२५ सप्टेंबर २०२४



२७ सप्टेंबर २०२४



१४ सप्टेंबर २०२४



**विद्यार्थी उद्बोधन वर्ग**

ग्रंथालयात विविध ज्ञानांचे स्रोत उपलब्ध आहेत. महाविद्यालयातील प्रथम वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना या स्रोतांबद्दल माहिती होण्याच्या दृष्टीने ग्रंथालय उद्बोधन सत्र ३, ५ आणि ६ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. ग्रंथालयाचा ग्रंथसंग्रह, मासिके, नियतकालिके, वेब ओपेक, ग्रंथालयाच्या वेळा, विविध

पारंपरिक, तसेच माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा, पुस्तक पेढी योजना, इलेक्ट्रॉनिक संसाधने, प्लॅटफॉर्म याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. तसेच ही संकल्पना देखील समजावून सांगण्यात आली. पुस्तक प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयाच्या पुस्तकांशीही ओळख करून देण्यात आली.



**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

**सप्टेंबर २०२४ महाराष्ट्र राज्य विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनाचा महामेळावा :**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण व नवी मुंबई महानगरपालिका यांच्या वतीने मोफत विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनाचा महामेळावा यांचे आयोजन राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, नवी मुंबई महानगरपालिका शाळा न. ५५ डॉ. आंबेडकर नगर, रबाळे, नवी मुंबई, इथे दिनांक १ सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आले होते. सदर कार्यक्रममध्ये विद्या विद्याप्रसारक मंडळाचे टिएमसी विधी महाविद्यालयाने सहभाग नोंदवला होता. सदर कार्यक्रमासाठी विधी महाविद्यालयाचे सहा. प्रा. शिवाजी बिबे आणि प्रेरणा वसावे यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमामध्ये मुंबई उच्च न्यायालयचे माननीय न्यायमूर्ती श्रीमती गौरी गोडसे उपस्थित होत्या. तसेच श्रीनिवास बी अग्रवाल (प्रमुख जिल्हा न्यायधीश, ठाणे) यांनी सदर कार्यक्रमयाचे अध्यक्षपद भुषविले.




**दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी नवीन सहाय्यक प्राध्यापक कामावर रुजू.**



जुलै महिन्यात झालेल्या ६ सहाय्यक प्राध्यापकांच्या मुलाखती नंतर एकूण ६ प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापैकी पाच सहाय्यक प्राध्यापक यांनी दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी रुजू झाले होते. श्री. मनोजकुमार नाईक हे दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी रुजू झाले.

**१४ सप्टेंबर २०२४ रोजी महाविद्यालयामध्ये CDC आणि IQAC ची बैठक पार पडली.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ प्रमाणे वेळोवेळी महाविद्यालयाने CDC IQAC यांची बैठक घेणे आवश्यक असते. १४ सप्टेंबर रोजी सायंकाळी या दोन्ही समितीच्या बैठका घेण्यात आल्या. यावेळी सर्व मान्यवर सदस्य उपस्थित होते.

**POCSO कायद्यावरील ऑनलाईन – कार्यशाळा**

दिनांक १६ सप्टेंबर २०२४ रोजी विधी महाविद्यालयाच्या विधी सहाय्य कक्षाद्वारे POCSO गुन्हे,

खटला आणि प्रक्रिया या विषयावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यासाठी व्याख्याते म्हणून सहा. प्रा. विनोद एच. वाघ आणि सहाय्यक सरकारी वकील ॲड. डॉ. गोपीचंद खाडे म्हणून उपस्थित होते. सदर व्याख्यान हे सर्वांसाठी खुले होते.

### प्रथम वर्ष एलएलबी प्रवेश प्रक्रिया पूर्ण

प्रथम विधीची प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे पार पाडली. यातील तिसरी फेरी ९ ते १२ सप्टेंबर दरम्यान होती. संस्थात्मक फेरी २० ते २४ सप्टेंबर दरम्यान होती. संस्थात्मक फेरी दरम्यान २४०/२४० अनुदानित (aided) जागा भरल्या गेल्या आहे तसेच ६०/६० विनाअनुदानित (Un-aided) जागा भरल्या गेल्या आहेत. २१/२४ EWS अनुदानित (aided) जागा रिक्त आहे. तसेच ६/६ EWS विनाअनुदानित (Un-aided) जागा रिक्त आहेत. महाराष्ट्र सीईटी समितीच्या सूचनेप्रमाणे १ ऑक्टोबर रोजी प्रवेश प्रक्रिया स्थगित केले गेले आहेत.

### २७ सप्टेंबर रोजी प्रथम वर्ष अभिमुखता (Orientation) कार्यक्रम

२७ सप्टेंबर २०२४ रोजी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सायंकाळी ५ ते ७ ह्या वेळेत अभिमुखता कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रोग्रॅम आउटकम आणि कोर्स आउटकम यावर सविस्तर माहिती देण्यात आली. याशिवाय विद्यार्थ्यांना महाविद्यालय, वर्ग, अभ्यासक्रम, वेळापत्रक आणि शिक्षकांची ओळख करून देण्यात आली. विद्यार्थ्यांना वाचनालय आणि व्यायामशाळेच्या सुविधांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना सर्व उपक्रम आणि स्पर्धांमध्ये सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाची प्रत, अंतर्गत सूचना, प्रात्यक्षिक प्रशिक्षण अभ्यास साहित्य, इंटर्नशिप डायरी आणि अंतर्गत पुस्तिकांचे वाटप करण्यात आले.




### द्वितीय व तृतीय विधीची अंतर्गत परीक्षा संपन्न

मुंबई विद्यापीठाच्या पॅटर्न प्रमाणे द्वितीय व तृतीय विधीची अंतर्गत परीक्षा दिनांक २० व २१ सप्टेंबर २०२४ रोजी घेण्यात आली.

### १०० पेक्षा अधिक शाळा व महाविद्यामध्ये विधी जागृती अभियान संपन्न

वि.प्रं.म.चे टि.एम.सी विधी महाविद्यालय यांनी द्वितीय विधी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील किमान १०० शाळा व महाविद्यालयामध्ये विधी जागृती अभियान राबविले गेले. या अभियानांतर्गत १६० विद्यार्थ्यांनी विविध कायद्यांवर जागृती केली. यामध्ये पोक्सो, आरटीआय, आरटीई, मूलभूत कर्तव्ये व अधिकार, विशाखा समिती, सायबर गुन्हे व इतर अनेक विषयांवर मार्गदर्शन केले आहे. सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या या जनजागृती चे फोटो व अहवाल महाविद्यामध्ये जमा केलेला आहे. विधी महाविद्यालय असा उपक्रम मागील तीन-चार वर्षांपासून राबवित आहे व त्याचा अहवाल जिल्हा, राज्य व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांना पाठवत असतो.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना

राज्यामध्ये युवक वर्ग आपले शिक्षण पूर्ण करून दरवर्षी मोठ्या संख्येने नोकरी व्यवसाय यांच्या शोधात बाहेर पडतात. परंतु संबंधित कामाचा अनुभव नसल्यामुळे नोकरी प्राप्त करणे अथवा स्वतःचा व्यवसाय सुरू करणे यात अडचणी येतात. या कारणामुळे युवक वर्गामध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. युवक उमेदवारांना अधिकाधिक संधी उपलब्ध व्हाव्या यासाठी महाराष्ट्र शासनाच्या 'कौशल्य, रोजगार, उद्योजक व नावीन्यता विभाग' आणि 'मुख्यमंत्री जन कल्याण कक्षा' यांच्या मार्फत 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' राबवली जात आहे. या योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थींना १२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ६ हजार रुपये, आयटीआय व पदविकाधारक विद्यार्थ्यांना ८ हजार, तर पदवीधर, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन दरमहा डीबीटी पद्धतीने येणार आहे. या योजने अंतर्गत विद्या प्रसारक मंडळाचे अभियांत्रिकी महाविद्यालय, ठाणे येथे आज पर्यंत ७ पदवीधर उमेदवारांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

### आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र

भारतातील विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य वाढवून त्यांना उद्योग सक्षम करण्यासाठी आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजनेचे उद्घाटन भारताचे आदरणीय पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांनी २० सप्टेंबर रोजी केले. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत केंद्र, राज्य व जिल्हा पुरस्कृत विविध कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांच्या माध्यमातून राज्यातील १५ ते ४५ वयोगटांतील युवक-युवतींना विविध ३७ क्षेत्रांमध्ये (बँकिंग, माहिती तंत्रज्ञान, बांधकाम, इलेक्ट्रॉनिक्स इ.) प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनवून रोजगार अथवा स्वयंरोजगारच्या संधी पुरवण्यात येतील. या उपक्रमासाठी महाराष्ट्रातील १००० महाविद्यालयांची निवड झाली आहे. यामध्ये ठाण्यात नव्याने सुरू झालेल्या विद्या प्रसारक मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाची निवड झाली आहे. या उपक्रमा अंतर्गत PCB-Asembly Operator आणि Web Developer या दोन व्यवसायाभिमुख प्रशिक्षण वर्गांची सुरुवात १५० विद्यार्थ्यांसाठी करण्याची मान्यता अभियांत्रिकी महाविद्यालयाला मिळाली आहे. 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र' यांची समन्वयिका म्हणून अभियांत्रिकी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉम च्या विभागप्रमुख डॉ. कीर्ती आगाशे या काम बघतील.

नॅशनल स्कील्स कॉलीफिकेशन फ्रेम वर्क (NSRF) अन्वये स्थापित मानांकनानुसार १८०० पेक्षा अधिक व्यवसायिक अभ्यासक्रमांचे संबंधित प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणा अंती उमेदवारांचे मूल्यमापन आणि प्रमाणिकरण हे केंद्र शासनाच्या 'नॅशनल कॉन्सिल फॉर व्होकेशनल ट्रेनिंग' तर्फे करण्यात येईल. ही योजना अमलात आणल्यामुळे विद्यार्थ्यांना भरपूर फायदे मिळणार आहेत. जसे, आजचे उद्योग हे अशा विद्यार्थ्यांचा शोध घेत आहे, जे त्वरित काम करतील त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी उद्योगांकडे वेळ व पैसा उपलब्ध नाही. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना सैद्धांतिक व व्यावहारिक ज्ञानाने सक्षम करेल, ज्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच, आधुनिक कामाच्या पद्धतीत तंत्रज्ञानाचा वाढता वापर होत आहे. ही योजना विद्यार्थ्यांना या बदलाशी जुळवून घेण्यासाठी आवश्यक कौशल्ये शिकविल ज्यामुळे कौशल्याधारित प्रशिक्षण विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्याच्या क्षमतेत, तर्कसंगत विचारात आणि आत्मविश्वासात वाढ करील. यामुळे विद्यार्थ्यांना कामाच्या संधी निर्माण होतीलच; पण त्याबरोबर स्वतःच्या व्यवसायाच्या संधी शोधण्यासाठी प्रोत्साहित करील असा विश्वास वाटतो.

'आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजना' ही सुरू होत आहे. जोशी बेडेकर कॉलेज ऑफ आर्टस अँड कॉमर्स ही शिक्षण संस्था या योजनेचा एक भाग होत आहे. ही योजना विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्यात महत्त्वाची भूमिका निभावेल. ज्यामुळे पारंपरिक महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट करिअर करण्याची संधी उपलब्ध होईल.

**अंतर्गत स्मार्ट इंडिया हॅकाथॉन (SIH)**

स्मार्ट इंडिया हॅकाथॉन (SIH) हा एक राष्ट्रीय उपक्रम आहे, जो विद्यार्थ्यांना वास्तविक-जगातील समस्या सोडवण्यासाठी व्यासपीठ देतो. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये नवकल्पना आणि समस्या सोडवण्याच्या कौशल्यांना प्रोत्साहन देणे आणि शैक्षणिक ज्ञान आणि व्यावहारिक अनुप्रयोगांमधील अंतर कमी करणे असा आहे. हा उपक्रम शिक्षण मंत्रालयाच्या इंनोवाशन विभाग (MoE's Innovation cell) आणि ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (AICTE) यांच्या सहकार्याने राबिवण्यात येतो. विद्या प्रसारक मंडळाच्या पदविका संस्थेने दिनांक १९ सप्टेंबर, २०२४ रोजी अंतर्गत स्मार्ट इंडिया हॅकाथोंचे आयोजन केले. सदर कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शाखांच्या मिळून १६ गटांनी सादरीकरण केले. या कार्यक्रमाला श्री. सुरेन्द्र रहाळकर (संस्थापक-Analyte Control), श्री. मंदार भडंग (Senior HR Manager, BITs Pilani) आणि सागर भुतडा (Data Scientist, Colgate) या मान्यवरांनी मूल्यांकनाचे काम केले. या कार्यक्रमाची संपूर्ण माहिती सौ. निवेदिता राणे यांनी संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली. हा कार्यक्रम विद्यालयाच्या इन्स्टिट्यूशन's इंनोवाशन कौन्सिलच्या (IIC) अध्यक्षा सौ. गौतमी पुजारे व प्राचार्य श्री. डी. के. नायक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.



**इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टम विभागातील लक्षणीय कामगिरी (महिना - सप्टेंबर २०२४)**

- तृतीय वर्ष इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टम विभागाच्या चार विद्यार्थ्यांनी MSBTE राज्यस्तरीय तांत्रिक पेपर सादरीकरण स्पर्धेत २०२४-२५ मध्ये भाग घेतला आणि बक्षिसे जिंकली. पानसकर तेजस्विनी मनोज आणि निम्मारी कुणाल बाबुराव या विद्यार्थ्यानी 'स्मार्ट सिटी आणि स्मार्ट ग्रीड' हा पेपर सादर केल्याबद्दल १५,०००/- रोख पारितोषिकासह प्रथम पारितोषिक प्राप्त केले. जोशी देवदास संतोष व बर्नवाल किरण गौतम यांना रोख रु. ५,०००/- सह तृतीय पारितोषिक मिळाले. यांनी 'इलेक्ट्रिक वाहनांमध्ये बॅटरी आणि बॅटरी व्यवस्थापन' हा पेपर सादर केला. ही स्पर्धा २५ सप्टेंबर २०२४ रोजी MSBTE ने श्री. भागुभाई मफतलाल पॉलिटेक्निक, विलेपार्ले, मुंबई येथे आयोजित केली होती.



प्रथम पारितोषिक - पानसकर तेजस्विनी मनोज आणि निम्मारी कुणाल बाबुराव या एमएसबीटीई राज्यस्तरीय तांत्रिक पेपर सादरीकरण स्पर्धा २०२४-२५.



तृतीय पारितोषिक – जोशी देवदास संतोष आणि बर्नवाल किरण गौतम या एमएसबीटीई राज्यस्तरीय तांत्रिक पेपर सादरीकरण स्पर्धा

• २४ सप्टेंबर २०२४ रोजी व्ही.ई.एस. पॉलिटेक्निकच्या व्यावसायिक संस्थांनी आयोजित केलेल्या 'पर्यावरणीय शाश्वतता' या विषयावरील राष्ट्रीय स्तरावरील प्रश्नमंजुषा स्पर्धेत तृतीय वर्षाच्या इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम विभागातील पानसकर तेजस्विनी मनोज या विद्यार्थिनीने भाग घेतला आणि वसुंधरा-१ या राष्ट्रीय स्तरावरील प्रश्नमंजुषा स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळवला.



VESP VIVEKANAND EDUCATION SOCIETY POLYTECHNIC

CERTIFICATE
OF APPRECIATION

This is to certify that Miss. Tejaswini Panaskar has secured 2nd rank in VASUNDHARA-1 National Level Quiz Competition on Environmental Sustainability organized by the professional bodies of V.E.S Polytechnic on 24th September,2024.

Deepak Jeetarwal, President - ISTE
Vidya Lunge, ISTE Students Chapter Incharge
Vikrant Joshi, Principal


• १९ सप्टेंबर २०२४ रोजी VPM IIC सेलने आयोजित केलेल्या अंतर्गत स्मार्ट इंडिया हॅकाथॉन (SIH) आयडिया स्पर्धेत तृतीय वर्षाच्या इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम विभागातील १५ विद्यार्थ्यांच्या तीन संघांनी भाग घेतला आणि त्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पना बाह्य परीक्षकांच्या पॅनेलसमोर मांडल्या. एक संघ-निम्मारी कुणाल बाबुराव आणि पानसकर तेजस्विनी मनोज, पिंगळे वैदेही रमेश, खेडेकर आर्यन प्रकाश, बर्नवाल किरण गौतम, मोहंती कुमुदरंजन कनुचरण यांनी इंटर्नल स्मार्ट इंडिया हॅकाथॉन (SIH Competition) मध्ये 'मानवरहित वाहन' या कल्पनेसाठी द्वितीय क्रमांक पटकावला. आणि राष्ट्रीय स्तरावरील SIH साठी कल्पना नोंदणीकृत केली.

• द्वितीय वर्षाच्या इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम विभागातील विद्यार्थी चित्ता केदार दुर्गेशने २४ सप्टेंबर २०२४ रोजी VPMs ग्रीन क्लबने आयोजित केलेल्या




पोस्टर मेकिंग स्पर्धेत इको-फ्रेंडली भगवान गणेशावरील पोस्टरसाठी दुसरे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले.

**महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी**



विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन/ अभियांत्रिकी महाविद्यालय, ठाणे येथील ग्रंथालय आणि माहिती केंद्रातर्फे दि.२, ऑक्टोबर महात्मा गांधी जयंतीचे औचित्य

साधून महात्मा गांधीच्या विविध ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. सदर प्रदर्शन हे दिनांक ०१.१०.२०२४ ते ०३.१०.२०२४ पर्यंत सकाळी ८.०० ते सायंकाळी ४.४५. पर्यंत ग्रंथालय आणि माहिती केंद्र या ठिकाणी सर्वांसाठी खुले ठेवण्यात आले होते. 'माझे सत्याचे प्रयोग' त्याचे आत्मचरित्र हे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

'गांधीजी आणि गैरसमज' या विषयीचे लेख प्रदर्शनात ठेवण्यात आले होते. महात्मा गांधी याच्या विषयीचे जे गैरसमज होते ते या लेखाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहेत. महात्मा गांधी जयंतीनिमित्ताने त्याच्या विचारांचा प्रसार विद्यार्थ्यांमध्ये व्हावा हा या प्रदर्शना मागचा प्रमुख हेतू होता. त्यांनी अहिंसावादी विचार, शांती मार्ग, सत्याग्रह चळवळ, चले जाव चळवळ इत्यादी मार्गाने भारताला त्यांनी स्वतंत्र केले.

सदर प्रदर्शन पाहण्यासाठी तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने हजर होते. प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी डॉ. गीताली इंगवले, श्री. चंद्रकांत शिंगाडे, सौ. प्रज्ञा दळवी आणि सौ. आनंदी नाकटे इत्यादींचे सहकार्य लाभले.



ग्रंथ प्रदर्शन पाहताना विद्यार्थी



## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

६ सप्टेंबर २०२४ : सहाय्यक प्राध्यापक प्रथमेश उमेश तावडे यांना 'बँकिंग उद्योगातील करिअर संधी' या विषयावरील सत्रासाठी जय हिंद महाविद्यालयात अतिथी वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले.




१५ सप्टेंबर २०२४ : डॉ. नीतिन जोशी आणि डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांना रोटरी क्लब ऑफ अमारा - ठाणे तर्फे, राष्ट्रीय उभारणी (नेशन बिल्डर) पुरस्कार २०२४ प्रदान करून, शिक्षणाच्या माध्यमातून देशाच्या उन्नती आणि विकासात उल्लेखनीय योगदानासाठी, सन्मानित करण्यात आले.





१९ सप्टेंबर २०२४ : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सतर्फे उद्योग-शैक्षणिक संबंध मजबूत करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून साईधरा, भिवंडी येथील गोदरेज राष्ट्रीय वितरण केंद्राला औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले. डॉ. व्ही. एन. ब्रिम्सचे संचालक डॉ. नीतिन जोशी यांनी चालवलेला हा उपक्रम, विद्यार्थी आणि प्राध्यापकांना उद्योगातील नवीनतम प्रवाह आणि व्यावहारिक अनुप्रयोगांसह अद्ययावत ठेवण्याच्या संस्थेची बांधिलकी अधोरेखित करतो. या भेटीत १८ विद्यार्थी आणि २ प्राध्यापकांनी सहभाग घेतला. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना वितरण केंद्राच्या परिचालना संबंधी विविध विषयांची व्यापक माहिती मिळाली.




२० सप्टेंबर २०२४ : डॉ. पल्लवी चंदवासकर आणि डॉ. विभूती सावे यांना, बी.एन. बांदोडकर





महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी 'PO-CO मॅपिंग आणि अटेन्मेंट' या विषयावर एक प्राध्यापक विकास कार्यशाळा आयोजित करण्यासाठी अतिथी वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले. कार्यशाळेत ६० हून अधिक प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

२१ सप्टेंबर २०२४ : सीएसआर समितीतर्फे २९ विद्यार्थ्यांनी जुहू समुद्रकिनारा स्वच्छता उपक्रमा मध्ये भाग घेतला. ही मोहीम पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने आयोजित केली होती. डॉ. व्ही. एन. ब्रिम्सला पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडून या समुद्रकिनारा स्वच्छता उपक्रमात सहभागासाठी पुरस्कार देखील मिळाला.




२१ सप्टेंबर २०२४ : सीएसआर समितीतर्फे एमएमएस च्या प्रथम वर्षीच्या काही निवडक विद्यार्थ्यांसाठी 'हरयाली' येथे निसर्ग भ्रमंतीचे आयोजन करण्यात आले.



## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक आणि संगणक अभियांत्रिकी विभागाने 'सेमीकंडक्टर तंत्रज्ञानामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि IoT ची भूमिका' या विषयावर ऑनलाईन सेमिनारचे आयोजन केले होते. AI आणि IoT तज्ज्ञ श्री. प्रवीण हंचिनल यांनी या कार्यक्रमात AI चे IoT सिस्टीमसह एकत्रीकरण आणि या प्रक्रियेत सेमीकंडक्टर प्रगतीची महत्त्वपूर्ण भूमिका जाणून घेण्यात आली. श्री. हंचिनल यांनी AI चिपसेट, लो-पॉवर सेमीकंडक्टर आणि 5G तंत्रज्ञान यांसारख्या प्रमुख नवकल्पनांवर चर्चा केली, जे स्मार्ट शहरे, आरोग्यसेवा आणि स्वायत्त प्रणालींचे भविष्य घडवत आहेत. सेमिनारचा समारोप एका आकर्षक प्रश्नोत्तर सत्राने झाला, या सत्रात ५०० हून अधिक सहभाग नोंदविला.

दिनांक २५ सप्टेंबर २०२४ रोजी 'मर्चंट नेव्हीमधील करिअर संधी' या विषयावर एक दिवसीय सेमिनार प्रतिष्ठित लेखक आणि मर्चंट नेव्ही तज्ज्ञ श्री. प्रथम म्हात्रे यांनी संबोधित केले. या सेमिनारचे उद्दिष्ट तरुणांना मर्चंट नेव्हीमधील संधींबद्दल माहिती देणे आणि या भरभराटीच्या क्षेत्रात करिअर कसे घडवावे याबद्दल मार्गदर्शन करणे होते. उद्घाटन व स्वागत कार्यक्रमाची सुरुवात प्रा.प्रियांका निकम यांनी दिलेल्या स्वागतपर भाषणाने झाली. श्री. प्रथम म्हात्रे यांनी लिहिलेली 'द फ्लोटिंग लाईफ इन मर्चंट नेव्ही' आणि 'सातासमुद्रापार' ही पुस्तके प्रसिद्ध असून ते समुद्री जीवन आणि मर्चंट नेव्हीमधील करिअर वाढीसंबंधी उपस्थितांना मार्गदर्शन केले.



दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभाग व Indian Association For Radiation Protection यांच्या संयुक्त विद्यमाने 'Public Awareness Programme on Beneficial Effects of Radiation Technology and Indian Nuclear Energy Programme' चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश समाजामध्ये Ionizing Radiation बाबत जागृती करणे आणि अणु ऊर्जेच्या आणि Ionizing Radiationच्या सुरक्षित वापराबद्दल माहिती देणे हा होता.

पहिल्या सत्रामध्ये रुपाली कामत (ERMS/ EM-D, BARC) यांनी Radiation Quantities, Units and Effects या विषयवार मार्गदर्शन केले. यात त्यांनी radiation चे प्रकार, त्याबाबत मूलभूत संकल्पना, वातावरणातील radioactivity याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रामध्ये श्री. संजय पाटील यांनी Radiation Protection and Monitoring या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केले. तसेच या क्षेत्रातील विविध करिअर संधींची माहिती दिली. यानंतर 'कम मे है दम' या एकांकीकेद्वारे Radiation तंत्राची भविष्यातील संकटांवर मात करण्यासाठी असणारी गरज व उपयुक्तता विषद करण्यात आली. या कार्यशाळेमध्ये पालशेत व गुहागर येथील कनिष्ठ महाविद्यालयातील, तसेच महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.



दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी संगणक अभियांत्रिकी विभागातील प्रा. राधिका कदम यांनी राष्ट्रीय पोषण अभियानात सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी ६० महिलांसह PHC डॉ. शशिकला वाडकर, अंगणवाडी पर्यवेक्षिका सौ. हळये त्याच प्रकारे आजूबाजूच्या १५ गावांतील अंगणवाडी सेविका, महिला बचत गटांच्या सदस्य आणि गरोदर महिला उपस्थित होत्या.



•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.